

# हॅलो प्रभात

नवे विचार...नवी सुरुवात

RNI NO. MAHMAR/2020/79996

संपादक : संजीव शाळगांवकर

▪ मुंबई ▪ पुणे ▪ सांगली ▪ कोल्हापूर ▪ सातारा ▪ सोलापूर ▪ अहिल्यानगर

हॅलो प्रभात LIVE

Hello Prabhat Media

Print - Electronic - Social

**पुणे** ▪ वर्ष : ०६ ▪ अंक : ३५१ ▪ शनिवार, २८ मार्च २०२६ ▪ किंमत : ३ रुपये ▪ पाने : ४


“ सहकारातून समृद्धीकडे... शतकभराचा सार्थ विश्वास ”

## सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ;लि.सांगली.

# शताब्दी वर्ष २६-२७

### शताब्दी महोत्सव २८ मार्च २०२६ ते २७ मार्च २०२७

* सभासद, ठेवीदार, कर्जदार, ग्राहक यांच्या सहकार्य,सहभाग व विश्वासाने शतकी वर्षात यशस्वी पदार्पण.
* ग्रामीण, दीनदुबळ्या, शेतकरी, कामकरी यांच्या विकासात गेल्या ९९ वर्षात बँकेची मोलाची कामगिरी
* सभासद, ठेवीदार सर्व कर्जदार, ग्राहक यांना धन्यवाद व आभार

**आपला विश्वास : आमची समर्थ साथ**

**सभासदांच्या अविरत सेवेसाठी कटिबद्ध असणारी**

**शतकमहोत्सवी बँक तुमच्या सोबत!**

### शतकी सिंहावलोकन

| अ.क्र. | तपशील | १९३० (रु.लाखांत) | १९५० (रु.लाखांत) | १९७० (रु.कोटीत) | १९९० (रु.कोटीत) | २०१० (रु.कोटीत) | २०२५ (रु.कोटीत) | २०२६ फेब्रु. (रु.कोटीत) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | व्यक्तिशः सभासद | ९२ | ५२३ | ५८३ | ३८० | ३६३ | ४ | ४ |
| २ | सोसायटी सभासद | १८ | १५९ | ९१७ | १८१४ | ३८८१ | ३०७७ | ३२९० |
| ३ | भाग भांडवल | ०.४३ | १.२३ | ०.९५ | ५.९३ | ५६.४७ | १९०.६८ | १९७.९१ |
| ४ | रिझर्व व इतर फंड्स | ०.०२ | १.२३ | ०.२९ | ६.६६ | १६७.१२ | १०७२.९२ | १०८८.७० |
| ५ | ठेवी | १.८१ | १२.२७ | ५.२८ | १५८.६९ | १८७६.६५ | ८८९२.४८ | ९०७२.२० |
| ६ | बाहेरील कर्जे | ---- | ----- | ३.८१ | १५.६० | ४४.६२ | १४११.७६ | १११९.७९ |
| ७ | गुंतवणूक | ०.१५ | ३.३२ | १.८९ | ५३.१२ | ९७९.६० | ३६२५.३२ | ३२५६.११ |
| ८ | दिलेली कर्जे | १.८८ | ३.०२ | ८.११ | १२१.०१ | १०५८.५३ | ७०८८.९२ | ७८४९.५६ |
| ९ | खेळते भांडवल | २.३९ | १५.८२ | १०.८० | १९३.७९ | २२८१.७२ | १२१४७.८७ | १२२१८.४३ |
| १० | शाखा १ विस्तारित कक्ष व मुख्य कार्यालयासह | १ | २ | ३३ | १४० | २१८ | २१९ | २२० |
| ११ | नफा | ०.०५ | ०.२७ | ०.०९ | २.३५ | ८.८६ | १८६.१९ | ---- |

### शताब्दी महोत्सवानिमित्त होणारे कार्यक्रम



मा. श्री. मानसिंगराव नाईक
अध्यक्ष




**कृषी व पशु प्रदर्शन**

**महिला बचत गट प्रदर्शन**

दि.17 ते 21 एप्रिल 2026

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्टेडीयम, सांगली.

**सभासदांना स्मार्ट कार्ड वाटप**






मा. श्रीमती जयश्री पाटील
उपाध्यक्षा

### संचालक मंडळ


मा. खास.श्री.विशाल पाटील


मा.आम.श्री. सत्यजित देशमुख


मा. श्री. अजितराव घोरपडे


मा. श्री. मोहनराव कदम


मा. श्री. दिलीपराव पाटील


मा. श्री. महेंद्र लाड



मा. श्री. संग्रामसिंह देशमुख


मा.श्री.सुरेश पाटील


मा.श्री.ॲड.राजेंद्र उर्फ चिमण डांगे


मा.श्री.तानाजी पाटील


मा.श्री.प्रकाश जमदाडे


मा.श्री.बाळासो पाटील


मा.श्री.वैभव शिंदे



मा.श्री.पृथ्वीराज पाटील


मा. श्री.राहुल महाडिक


मा. श्री.अमोल बाबर


मा. श्री.बाळासाहेब होनमोरे


मा. श्रीमती अनिता सगरे


मा. श्री.मन्सूर खतीब


मा. श्री.मनोज शिंदे
तज्ञ संचालक


मा.श्री.रामचंद्र सरगर
तज्ञ संचालक


मा.श्री.सुनील चव्हाण
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सांगली.


मा.श्री.निलेश चौधरी
सहाय्यक महाव्यवस्थापक (नाबार्ड)


श्री.शिवाजीराव वाघ
मुख्य कार्यकारी अधिकारी

**पत्ता : पद्मभूषण वसंतदादा पाटील मार्ग, कर्मवीर भाऊराव पाटील चौक, सांगली.**

**फो.०२३३ - २३२ ४६४१ ते ४५ ई-मेल : sanglidccbank@sanglidccb.bank.in**




# विवेकाचा मार्ग की भोंदूपणाचा अंधार?

संत परंपरेतून समाजाला जागं करणाऱ्या संत तुकाराम यांनी अभंगातून विचारलेले जळजळीत प्रश्न आजही तितकेच लागू पडतात. वैराग्याचा आव आणत, दैवी शक्तींचे दावे करणारे तथाकथित 'साधू' प्रत्यक्षात स्वार्थ, पाखंडीपणा आणि अनाचाराचे केंद्र बनत असल्याचे कटू वास्तव पुन्हा एकदा समोर आले आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्याच्या मूल्यांपासून ते राजर्षी शाहू महाराज, महात्मा ज्योतिराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घडवलेल्या सामाजिक न्यायाच्या परंपरेपर्यंत विवेक आणि समतेचा वारसा लाभलेल्या महाराष्ट्रात भोंदूबाबांचे वाढते जाळे ही गंभीर चिंतेची बाब आहे. नाशिक येथील कथित भोंदूबाबा प्रकरणाने या संकटाचे भयावह स्वरूप उघड केले. महिलांचे शोषण, आर्थिक फसवणूक आणि मानसिक गुलामी यांसारखे आरोप केवळ एका व्यक्तीपुरते मर्यादित नसून, व्यापक सामाजिक विघटनाचे द्योतक आहेत. अशा भोंदूबाबांना मिळणारा सामाजिक स्वीकार, राजकीय आश्रय आणि सामान्य माणसाच्या असुरक्षिततेचा गैरफायदाङ्मया सर्व घटकांनी मिळून ही विकृती अधिक बळकट केली आहे. अंधश्रद्धा आणि विवेक यांच्यातील संघर्ष महाराष्ट्रासाठी नवा नाही. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी आयुष्यभर अंधश्रद्धेविरुद्ध लढा दिला आणि त्यासाठी प्राणांची आहुतीही दिली. तरीही, बदलत्या काळात अंधश्रद्धेने नवे रूप धारण केले आहे. सोशल मीडिया आणि डिजिटल माध्यमांमुळे 'चमत्कार', 'दैवी शक्ती' आणि 'तत्काळ उपाय' यांची फसवी बाजारपेठ अधिकच विस्तारली आहे. विशेषतः सामाजिक-आर्थिक अडचणीत सापडलेल्या लोकांना या जाळ्यात अडकवणे अधिक सोपे झाले आहे. या प्रश्नाचा सर्वात चिंताजनक पैलू म्हणजे राजकारणाशी असलेले संबंध. भोंदूबाबांच्या दरबारात राजकीय नेत्यांची उपस्थिती, त्यांचे सार्वजनिक सन्मान आणि कार्यक्रमांना मिळणारे प्रोत्साहन यामुळे त्यांना सामाजिक वैधता मिळते. परिणामी, कायद्याची भीती कमी होते आणि गुन्हेगारीला अप्रत्यक्ष संरक्षण मिळते. हे समीकरण लोकशाहीसाठी घातक आहे. महिलांवरील अत्याचाराच्या घटनांनी या प्रकरणाचे गांभीर्य आणखी वाढवले आहे. शारीरिक, मानसिक आणि आर्थिक शोषणाचा सामना करणाऱ्या पीडितांना न्याय मिळवण्यासाठी दुहेरी संघर्ष करावा लागतो. जर संरक्षणासाठी असलेल्या संस्थांच्याच भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत असेल, तर ही परिस्थिती अधिकच गंभीर ठरते. पोलीस आणि प्रशासनाच्या भूमिकेबाबतही प्रश्न उपस्थित होतात. दीर्घकाळ अशा प्रकारचे गुन्हे सुरू राहणे ही केवळ निष्क्रियता नसून, संभाव्य संगनमताची शंका निर्माण करणारी बाब आहे. कायद्याचे राज्य टिकवण्यासाठी यंत्रणांची निष्पक्षता आणि स्वायत्तता अत्यावश्यक आहे. भोंदूबाबांचे साम्राज्य केवळ धार्मिक नसून आर्थिकदृष्ट्याही प्रभावी असते. ट्रस्ट, दान आणि विविध उपक्रमांमधून मोठ्या प्रमाणावर पैसा गोळा केला जातो. या आर्थिक व्यवहारांची पारदर्शकता आणि कायदेशीर तपासणी आवश्यक आहे. अन्यथा, श्रद्धेच्या नावाखाली उभे राहिलेले हे साम्राज्य समाजाला अधिकच पोखरत राहील. आज महाराष्ट्र एका निर्णायक वळणावर उभा आहे. एका बाजूला विवेक, समता आणि प्रबोधनाचा वारसा आहे; तर दुसऱ्या बाजूला अंधश्रद्धा आणि भोंदूपणाचा अंधार. हा संघर्ष केवळ विचारांचा नाही, तर महाराष्ट्राच्या आत्म्याचा आहे. समाज, राज्यकर्ते आणि संस्थांनी या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहण्याची हीच वेळ आहे. कारण हा प्रश्न केवळ एका भोंदूबाबाचा नाही, तो महाराष्ट्राच्या भवितव्याचा आहे.

# भारताचे भवितव्य बदलणाऱ्या 1857 च्या बंडाचा इतिहास




**हॅलो प्रभात**

**स्वातंत्र्यपूर्व काळात कलकत्त्यापासून १६ मैलांवर असलेली एक शांत लष्करी छावणी अशी बराकपूरची ओळख होती. पूर्व भारतातील बहुतेक भारतीय सैनिक येथेच तैनात होते आणि ब्रिटिश गव्हर्नर जनरलचे निवासस्थानही येथे होते. याच छावणीतून बंडाचे निशाण उभारून इंग्रजांची झोप उडवली जाईल कदाचित याची कल्पना देखील कुणी केली नसेल.**

२९ मार्च १८५७ हा रविवार होता आणि दुपारची शांतता भंग झाली ती मंगल पांडे यांच्यामुळे. फक्त दुपारचीच नव्हे तर अनेक दिवसांसाठी महिन्यांसाठी भारत या घटनेनी पेटून उठला होता. त्या दिवशीचा घटनाक्रम आणि त्या घटनेनी भारताचे भवितव्य कसे बदलले याचा थोडक्यात इतिहास.

प्रसिद्ध इतिहासकार रुद्रांशु मुखर्जी यांनी त्यांच्या 'डेटलाइन १८५७ रिव्हॉल्ट अगेन्स्ट द राज' या पुस्तकात लिहिले आहे की, त्या दिवशी मंगल पांडेंनी रेजिमेंटचा कोट अंगावर घातला होता पण त्यांनी ट्राऊजरऐवजी धोतर परिधान केले होते. ते अनवाणी होते आणि त्यांच्याकडे लोडेड बंदूक होती. ते ओरडत होते. तिथे असलेल्या सैनिकांना त्यांनी शिवीगाळ केली आणि म्हटले की इंग्रज आले आहेत. पण तुम्ही त्यांच्याविरोधात लढायला का तयार नाहीत? ही काडतुसं आपण वापरली तर आपला धर्म भ्रष्ट होईल. धर्मासाठी उभे राहा. मी हे करावं म्हणून तुम्ही मला भडकवलंत पण आता मात्र तुम्ही माझी साथ द्यायला कुणी तयार दिसत नाहीये.

**नवीन रायफलची काडतुसं बनली बंडाचं कारण...**

मंगल पांडे यांच्याविरोधात सैनिकांनी बंडखोरी केली त्याचं कारण असं मानलं जातं की, ब्रिटीश सैन्यात नव्याने सामील झालेली इनफिल्ड पी-५३ रायफल. याआधी भारतीय सैनिक ब्राउन बीज नावाची बंदूक वापरत असत. १८५६ मध्ये भारतीय सैनिकांच्या वापरासाठी नवीन बंदूक आणण्यात आली होती, परंतु ही बंदूक लोड करण्यासाठी काडतुसं दातांनी फोडून वापरावी लागत होती. पण या रायफलमध्ये वापरण्यात येणाऱ्या काडतुसांमध्ये गाय आणि डुकराची चरबी वापरण्यात आल्याची अफवा भारतीय सैनिकांमध्ये पसरली. यामुळे त्यांच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या होत्या. पण इंग्रजांनी भारतीय सैनिकांचा अपमान करण्यासाठी हे जाणूनबुजून केले होते, असे भारतीय सैनिकांमध्येही एक सामान्य मत बनले होते. यामागे आणखी एक कथा होती. मंगल पांडेच्या खटल्यात साक्ष देताना लेफ्टनंट जे. ए. राइट यांनी याचा उल्लेख केला होता की,

'एकदा एका खालच्या जातीतील सैनिकाने ब्राह्मण सैनिकाला पाणी मागितले. त्या शिपायाने पाणी देण्यास नकार दिला यामुळे माझा तांब्या बाटेल,' असं त्याने उत्तर दिले. यावर त्या सैनिकाने प्रत्युत्तर दिले की, 'लवकरच तुमची जात भ्रष्ट होईल. कारण तुम्हाला डुक्कर आणि गायीच्या चरबीची काडतुसं वापरावी लागतील.' मग पाहता-पाहता ही बातमी आगीसारखी पसरली. ब्रिटिश सरकारला भारतीयांची जात व धर्म भ्रष्ट करायचा आहे, असा समज वणव्यासारखा पसरला.

**सैनिकांनी नवीन काडतुसं वापरण्यास नकार दिला**

२ फेब्रुवारी, १८५७ रोजी, बराकपूर येथे संध्याकाळच्या परेड दरम्यान सैनिकांनी इनफिल्ड रायफलसाठी वापरल्या जाणाऱ्या काडतुसेबद्दल नापसंती व्यक्त केली होती. हे इंग्रज अधिकाऱ्यांना कळवताना निष्ठावंत सैनिकांनी त्यांना माहिती दिली की, भारतीय सैनिक रात्री ब्रिटिश अधिकाऱ्यांना भेटून ठार मारण्याचा बेत आखत आहेत. सर्वात तीव्र प्रतिक्रिया ही बुऱ्हाणपूरच्या १९ नेटिव्ह इन्फंट्रीच्या सैनिकांकडून आली होती. त्यांच्या या प्रतिक्रियाला उत्तर देण्यासाठी इंग्रजांनी आपल्या तोफखान्यातील अधिकाऱ्यांनाच सर्व शस्त्रानिशी पाचारण केले. सैनिकांनी याचा निषेध म्हणून टेलिग्राफ ऑफिस जाळले, ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या घरावर अग्निबाण सोडले.

जॉन विल्यम काय यांनी त्यांच्या 'द हिस्ट्री ऑफ द सिपाय वॉर' या पुस्तकात लिहिले आहे की, याचा संबंध कदाचित एका जुन्या अफवेशी देखील असेल. ती अफवा अशी होती की, 'प्लासीच्या लढाईनंतर इंग्रजांची राजवट संपेल' असा एक समज सर्वांमध्ये होता. पण तसं काही झालं नाही. यातून पुढे शिपायांचे बंड घडले असावे.

**मंगल पांडेंनी लेफ्टनंट बो वर गोळी झाडली...**

मंगल पांडे हे १८४९ मध्ये वयाच्या २२ व्या वर्षी ईस्ट इंडिया कंपनीच्या बंगाल सैन्यात सामील झाले होते. २९ मार्चच्या आधी म्हणजेच १५ ते २७ मार्च महिन्यात हुनमान आणि शंकराची उपासना केली होती. २९ मार्च रोजी संध्याकाळी ५.१० वाजता मंगल पांडेंने गोंधळ सुरू करताच लेफ्टनंट बीएच बो परेड ग्राऊंडवर पोहोचले. ते पाहताच मंगल पांडे यांनी बो या अधिकाऱ्यावर गोळीबार केला. ती गोळी बो याला लागली नाही पण त्याच्या घोड्याच्या पायाला लागली. घोडा पडला आणि खाली पडलेल्या बो यांनी मंगल पांडे यांच्यावर गोळीबार केला. त्या गोळ्या मंगल पांडेंना लागल्या नाहीत. या घटनेनंतर मागून सार्जंट मेजर ह्युसनही आला.

**२९ मार्च : मंगल पांडेंनी भारताचे भवितव्यच बदलले...**

पीजीओ टेलरने आपल्या 'व्हॉट रियली हॅपन्ड ड्युअरींग द म्युटिनी' या पुस्तकात लिहिले आहे की, 'परिस्थिती पाहता ह्युसन आणि बो या दोघांनी आपल्या तलवारी काढल्या. तलवारींव्यतिरिक्त त्यांच्याकडे पिस्तुलंही होती. मंगल पांडे यांच्याकडे देखील तलवार होती. बो आणि ह्युसन या दोघांवर त्यांनी तलवारीने हल्ला चढवला. पण तिथे उपस्थित असलेले सर्व भारतीय सैनिक हा तमाशा बघतच राहिले, त्यांच्यापैकी शेख पल्टूशिवाय कोणीही इंग्रज अधिकाऱ्यांच्या मदतीला आलं नाही. त्याने मागून मंगल पांडेची कंबर पकडली. याचा परिणाम असा झाला की दोन्ही ब्रिटीश अधिकारी बचावले.

**भारतीय सैनिकांनी ब्रिटिश अधिकाऱ्याला धक्काबुक्की केली**

नंतर ह्युसनने साक्ष दिली, 'मंगल पांडेचा हल्ला माझ्यावर पूर्ण ताकदीनिशी झाला नाही. परिणाम असा झाला की मला ओरखडा आला. पण लेफ्टनंट बो मंगलच्या थेट हल्ल्याचा निशाणा बनले होते. त्यांचे जॅकेट रक्ताने माखले होते. पण तितक्यात एक सैनिक पुढे आला आणि त्याने माझ्या पाठीवर बंदुकीच्या दस्ता मारला. त्यामुळे मी खाली पडलो. 'मी त्या सैनिकाला ओळखू शकलो नाही पण त्याने रेजिमेंटचा गणवेश घातला होता हे मला दिसलं.'

'पडल्यावर उठताच मी डाव्या हाताने मंगलच्या कोटची कॉलर पकडली. मी माझ्या तलवारीने त्याच्यावर अनेक वार केले. त्याने माझ्यावर तलवारही चालवली आणि मी जखमी होऊन खाली पडलो. मंगलने त्याच्या डावा हाताने आम्हाला ढकललं आणि उजव्या हाताने आमच्यावर हल्ला केला.'

**मंगल पांडेंनी स्वतःवर गोळी झाडली**

दरम्यान, ३४ नेटिव्ह इन्फंट्रीचे कमांडिंग ऑफिसर कर्नल एसजी वेलरही घटनास्थळी पोहोचले. त्यांनी तेथे उपस्थित असलेल्या सैनिकांना मंगल पांडेला अटक करण्यास सांगितले परंतु त्यांनी तसे करण्यास नकार दिला. रुद्रांशु मुखर्जी लिहितात, 'नंतर वेलरने साक्ष दिली की मला त्यावेळी असहाय वाटत होतं. त्याचवेळी डिव्हिजनचे कमांडिंग ऑफिसर मेजर जनरल हियरसे हेही आपल्या दोन मुलांसह तेथे पोहोचले. हियरसे मंगल पांडेंच्या दिशेने जात असताना त्याच्याकडे लोडेड बंदूक असल्याचे कोणीतरी ओरडले. जेव्हा त्याच्या मोठ्या मुलाने ओरडून त्यांना सावध केले आणि तो म्हणाला की, 'तो तुमच्यावर हल्ला करू शकतो.'

**हर्से म्हणाले, 'जॉन, जर मी मेलो तर तू पुढे जा आणि त्या माणसाला संपव.'**

दरम्यान, हियरसे आपलं पिस्तूल हाती घेऊन क्वार्टर गार्डजवळ आला आणि एक आदेश दिला. 'जर आता कुणी एखादा सैनिक माझ्या आदेशाच्या विरोधात वागला तर त्याला मीच गोळ्या झाडेन.' असं सांगत त्याने मंगल पांडेंवर हल्ला करण्याचा आदेश सैनिकांना दिला. सैनिकांनी तो आदेश मानून मंगल पांडेंवर चाल केली. त्यानंतर मंगल पांडेंनी आपल्या बंदुकाच्या घोड्यात पायाचे बोट रुतवले आणि बंदुकीची नळी छातीवर ठेवली व गोळी चालवली. त्यांच्या छाती आणि खांद्याला इजा होत ती गोळी निघून गेली. त्यांच्या कोटाला आग लागली. मंगल पांडे हे पोटावर पडले होते. त्यांच्या पोटाखाली तलवार पडली होती. ती तलवार एका शीख सैनिकाने काढली. मंगल पांडेंना अटक करण्यात आली आणि रुग्णालयात पाठवण्यात आले.

**८ एप्रिल १८५७ : मंगल पांडेंना फाशीची शिक्षा**

त्या काळी गोऱ्या अधिकाऱ्यावर हल्ला करणं म्हणजे स्वतःचा मृत्यू ओढावून घेणं होतं. शिपाई नंबर १४४६ मंगल पांडे यांना या कृत्यासाठी मृत्यूदंडाची शिक्षा सुनावण्यात आली. ८ एप्रिल १८५७ रोजी सकाळी साडेपाच वाजता त्यांना इतर साथीदारांसोबत फाशी देण्यात आली. कोणत्याही इंग्रज अधिकाऱ्यांने त्यांना त्यांच्या वागणुकीबाबत प्रश्न विचारले नाहीत. आधी मंगल पांडे यांच्या फाशीच्या शिक्षेचं नियोजन १८ एप्रिल रोजी करण्यात आलं होतं. मंगल पांडेंची भीती अधिकाऱ्यांना वाटायची शिवाय त्यांचा इंग्रजांवर इतका धाक होता की, सर्व इंग्रज अधिकारी त्यांना इतके घाबरायचे. त्यामुळे त्यांनी सुरू केलेलं बंड इतर भागांत पसरू नये यासाठी इंग्रजांनी अत्यंत गुप्तता राखत पांडे यांना दहा दिवस आधीच ८ एप्रिल रोजी फासावर चढवले.' मंगल पांडे यांचा मृत्यू निश्चित झाला पण मृत्यूनंतरही त्यांच्या मृतदेहाजवळ जाण्यास इंग्रज घाबरत होते. त्यामुळे १८५७ च्या उठावात प्राण त्याग करणारे मंगल पांडे हे पहिले भारतीय ठरले.

- **भारताच्या स्वातंत्र्यानंतर तब्बल ३७ वर्षांनी भारत सरकारने ५ ऑक्टोबर १९८४ मध्ये मंगल पांडे यांच्या सन्मानाअंतर्गत एक टपाल तिकीट काढले, ज्यावर मंगल पांडे यांचा फोटोही होता.**
- **'मंगल पांडे : द रायजिंग स्टार' नावाचा चित्रपट २००५ साली प्रदर्शित झाला. त्यात मंगलपांडे यांची भूमिका आमिरखान यांनी साकारली होती.**

## 'आरोग्याची वारी शिवशंभोच्या दारी' २ हजारांहून अधिक शिवभक्तांना लाभ

**नातेपुते : हॅलो प्रभात**



चैत्र वारीनिमित्त शिखर शिंगणापूर कावड यात्रेदरम्यान नातेपुते येथे उभारण्यात आलेल्या आरोग्य सेवेमुळे २ हजारांहून अधिक शिवभक्तांना मोफत वैद्यकीय सुविधांचा लाभ मिळाला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून आणि आरोग्य विभागाच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना जिल्हाप्रमुख (ओबीसी) राजकुमार हिवरकर-पाटील यांच्या पुढाकाराने 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' उपक्रमांतर्गत ही सेवा उपलब्ध करून देण्यात आली. नातेपुते येथील शंभू महादेव मंदिरासमोर विशेष आरोग्य केंद्र उभारण्यात आले होते. या केंद्रामध्ये शिवभक्तांची रक्तदाब तपासणी, प्राथमिक उपचार तसेच आवश्यक औषधांचे मोफत वितरण करण्यात आले. विशेषत: पायी व अनवाणी चालत येणाऱ्या भाविकांना पायांच्या जखमांवर उपचार करण्यात आले. या उपक्रमात वैद्यकीय अधिकारी डॉ. शिवाजी शेंडगे यांच्यासह आरोग्य कर्मचाऱ्यांनी सेवा बजावली. तसेच स्थानिक स्वयंसेवकांनीही सहकार्य केले.

## वीजदर कपातीबद्दल देवेंद्र फडणवीस यांचे आभार : विश्वास पाठक

**मुंबई : हॅलो प्रभात**

महावितरणतर्फे राज्यात होणाऱ्या वीजपुरवठ्याच्या संदर्भात महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने बहुवार्षिक वीजदर आदेश दिला असून त्यामध्ये महावितरणच्या वीजदर कपातीच्या प्रस्तावावर शिक्कामोर्तब झाले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्यातील घरगुती, औद्योगिक व वाणिज्यिक अशा सर्व वीज ग्राहकांसाठी २०३० पर्यंत सलग पाच वर्षे टप्प्या टप्प्याने वीजदरात कपात होणार असून त्याबद्दल आपण मुख्यमंत्र्यांचे आभार व्यक्त करतो, अशी प्रतिक्रिया भारतीय जनता पार्टीचे प्रदेश प्रवक्ता व महावितरणचे स्वतंत्र संचालक विश्वास पाठक यांनी व्यक्त केली. ते म्हणाले की, गेले वर्षभर याबाबत आयोग, उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाच्या पातळीवर विविध सुनावण्या झाल्या. आता संपूर्ण वैधानिक प्रक्रिया पूर्ण करून आयोगाकडून आदेश आल्यामुळे स्पष्टता व निश्चितता आली आहे. त्यांनी सांगितले की, मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वात राज्यात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होत असून वीजदर कपातीच्या आदेशामुळे राज्याच्या आर्थिक विकासाला मोठ्या प्रमाणात चालना मिळणार आहे. कोणत्याही घटकातील वीज ग्राहकांसाठीच्या वीजदरात पाच वर्षे वाढ होणार नाही तर कपातच होणार आहे, ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे, असेही ते म्हणाले.

महिना शंभर युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांसाठी पाच वर्षात २६ टक्के इतकी मोठी वीजदर कपात होणार आहे. एकूण घरगुती वीज ग्राहकांमध्ये या गटातील ग्राहकांचे प्रमाण ७० टक्के आहे. महिना १०० ते ३०० युनिट वीज वापरणाऱ्या ग्राहकांसाठीच्या वीजदरातही पाच वर्षात पाच टक्के इतकी कपात होणार आहे, अशी माहिती त्यांनी दिली. त्यांनी सांगितले की, आयोगाने आर्थिक वर्ष २०२६ ते २०३० असा पाच वर्षांचा आदेश दिला आहे. त्यामध्ये आता आर्थिक वर्ष २०२६ -२७ मध्ये प्रवेश करत असल्याने वीज ग्राहकांना आदेशातील दुसऱ्या वर्षाचा दर लागू होईल म्हणजेच त्यांना अधिक सवलत मिळेल. सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीत (म्हणजे सोलर अवर्समध्ये) वापरलेल्या वीजेसाठीची सवलत आता प्रती युनिट ८ पैशावरून वाढून ८५ पैसे होईल. त्याच प्रमाणे शंभर युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांसाठीचा सरासरी दर आता ७ रुपये १० पैसे होईल. शंभर ते ३०० युनिट वीज वापरणाऱ्या ग्राहकांसाठीचा सरासरी दर १२ रुपये ९४ पैसे होईल. औद्योगिक ग्राहकांचाही दर आणखी कमी होईल.


## कुर्डुवाडीत ॲसिड हल्ल्याच्या निषेधार्थ निवेदन सादर

**कुर्डुवाडी : हॅलो प्रभात**

संगमनेर तालुक्यातील मौजे वडगाव पान येथील इयत्ता सहावीतील विद्यार्थिनी ईश्वरी डहाळे हिच्यावर झालेल्या ॲसिड हल्ल्याच्या निषेधार्थ संत नरहरी सोनार बहुउद्देशी संस्था व सराफ सुवर्णकार संरक्षण समितीच्या वतीने कुर्डुवाडी येथील पोलिस निरीक्षकांकडे निवेदन सादर करण्यात आले. या घटनेमुळे परिसरात संतापाची लाट उसळली असून महिलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सोनार समाजाचे अध्यक्ष संदीप दीक्षित, सुवर्णकार संरक्षण समितीचे माढा तालुका अध्यक्ष मयुर शहाणे व उपाध्यक्ष संतोष दीक्षित यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन देण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, निरपराध चिमुकलीवर झालेला ॲसिड हल्ला हा अत्यंत अमानुष व संतापजनक असून या घटनेने संपूर्ण समाजमन हादरले आहे. संबंधित आरोपींना तात्काळ अटक करून कठोर शिक्षा द्यावी, तसेच हा खटला फास्ट ट्रॅक न्यायालयात चालवावा, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे यावेळी शंकरराव वेदपाठक, धनंजय महामुनी, सुनील टाकसाळे, महेश दीक्षित, पप्पू बेदरे आदी उपस्थित होते.

## चेतक स्क्रीन अवॉर्ड्स ; २४ नामांकनांसह 'धुरंधर' आघाडीवर

**मुंबई : हॅलो प्रभात**




'द इंडियन एक्सप्रेस ग्रुप'च्या स्क्रीन अकॅडमीतर्फे येत्या ५ एप्रिल रोजी होणाऱ्या 'चेतक स्क्रीन अवॉर्ड्स'साठी नामांकनांची घोषणा करण्यात आली असून, आदित्य धर दिग्दर्शित 'धुरंधर' चित्रपट २४ नामांकनांसह आघाडीवर आहे. मोहित सूरी यांचा 'सैयारा' १७ तर नीरज घेवान यांचा 'होमबाउंड' १५ नामांकनांसह स्पर्धेत आहे. हिंदी चित्रपट आणि ओटीटी प्लॅटफॉर्मवरील उत्कृष्ट कलाकृतींचा गौरव करण्यासाठी या पुरस्कारांचे आयोजन करण्यात आले आहे. यंदा एकूण ३१ श्रेणींमध्ये नामांकन जाहीर करण्यात आले असून, थिएटर आणि ओटीटी या दोन्ही माध्यमांचा समावेश आहे. 'स्क्रीन अवॉर्ड्स' १९९५ पासून त्यांच्या पारदर्शक आणि गुणवत्ताधारित प्रक्रियेसाठी ओळखले जातात. यंदा ९५ टक्क्यांहून अधिक अकॅडमी सदस्यांनी मतदानात सहभाग नोंदवला. मूल्यांकनासाठी 'ऑलिम्पिक पद्धती'चा वापर करण्यात आला आहे.

## एमएमआर रिअल इस्टेट बाजारात तेजी; प्रीमियम घरांची मागणी वाढली


**मुंबई : हॅलो प्रभात**

CREDAI

मुंबई महानगर क्षेत्र २०२५ मध्ये देशातील सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारा निवासी रिअल इस्टेट बाजार ठरला आहे. प्रीमियम तसेच मध्यम-आय गटातील घरांना वर्षभर सातत्याने मजबूत मागणी मिळाल्याने या क्षेत्राला मोठी चालना मिळाली, असे क्रेडाई-लायसेस फोरासच्या ताज्या अहवालात नमूद करण्यात आले आहे. अहवालानुसार, ग्रेटर मुंबईने या वाढीत महत्त्वाची भूमिका बजावत देशातील सर्वाधिक निवासी विक्री मूल्य १,३३,००५ कोटी रुपये इतके नोंदवले. विशेष म्हणजे, २ कोटी ते ५ कोटी या उच्च-मूल्य श्रेणीतील घरांनी एकूण विक्रीत सर्वाधिक वाटा उचलला, ज्यातून प्रीमियम हाउसिंगची वाढती मागणी अधोरेखित होते. पुरवठा ट्रेंड्सकडे पाहता, १ कोटी ते ५ कोटी किमतीतील २बीएचके घरांना मोठी मागणी असून, १बीएचके युनिट्सची मागणी मुख्यतः ५० लाख ते २ कोटी या श्रेणीत केंद्रित असल्याचे दिसून येते. ग्रेटर मुंबईच्या बाजारात सध्या १,५८१ बिल्डर्सद्वारे विकसित २,६६३ प्रोजेक्ट्स असून, सुमारे २० महिन्यांचा इन्व्हेंटरी उपलब्ध आहे. यामुळे मागणी आणि पुरवठ्यात स्थिर पण विकसित होत असलेले संतुलन दिसून येत आहे.

## ट्रेडबायनरीकडून रक्तदान व मोफत आरोग्य तपासणी शिबिर

**ठाणे : हॅलो प्रभात**




ट्रेडबायनरीने अलीकडेच कासारवडवली येथे रक्तदान व मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन केले. या उपक्रमाचा उद्देश स्थानिक नागरिकांना लाभ मिळवून देणे हा होता. शिबिरासाठी राबविण्यात आलेल्या मेटा मोहिमेमुळे २ किलोमीटर परिसरातील ३.५ लाख लोकांपर्यंत पोहोच साधली गेली, ज्यामुळे व्यापक जनजागृती व सहभाग सुनिश्चित झाला. शिबिरादरम्यान उपस्थितांना सामान्य वैद्य, स्त्रीरोगतज्ज्ञ, जनरल सर्जन तसेच फिजिओथेरपिस्ट यांच्याकडून मार्गदर्शन मिळाले. याशिवाय रक्तदाब तपासणीसह प्राथमिक आरोग्य तपासण्या मोफत करण्यात आल्या. एचपीव्ही लसीकरणाची सवलतीच्या दरात उपलब्धता. सर्वावॅक आणि गार्डासिल यांसारख्या लसींमुळे गर्भाशयमुख, योनी व गुदमार्गातील कर्करोग तसेच जननेंद्रियावरील वॉर्ट्सपासून संरक्षण मिळते.

## महिंद्रा ट्रक्स एण्ड बसेसचा कोल्हापूरात विस्तार

**मुंबई : हॅलो प्रभात**



महिंद्राच्या ट्रक आणि बस विभागाने गेल्या चार वर्षांत उत्पादन विक्रीत नवनव्या विक्रमांची उंची गाठली आहे. हा टप्पा गाठल्यानंतर आता कंपनीने कोल्हापूर येथे अत्याधुनिक ३एस (सेल्स, सर्व्हिस आणि स्पेअर पार्ट्स) डीलरशिपचे केंद्र सुरु केले आहे. नुकतेच या केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. हे नवीन केंद्र सर्व आधुनिक सोयीसुविधांनी सज्ज असून, यामध्ये ६ सर्व्हिस बे उपलब्ध आहेत. या सोयीमुळे दररोज ६ पेक्षाही जास्त वाहनांची देखभाल दुरुस्ती करणे शक्य होणार आहे. ग्राहकांच्या आणि चालकांच्या सोयीसाठी विश्रांतीगृह, २४ तास आपत्कालीन ब्रेकडाऊन सेवा आणि अडब्लूची अखंड उपलब्धता यांसारख्या विशेष सुविधा पुरवण्यात आल्या आहेत.

नवे विचार...नवी सुरुवात
दैनिक हॅलो प्रभात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली - ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून **दैनिक हॅलो प्रभात**, कार्यालय, स.न.१४/१५/२/३, फ्लॅट नं.२०, शिवपुष्प, ए पार्क, वडगाव बु., पुणे- ४११०४१. (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले.
■ **पुणे कार्यालय :** १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे-४११०३० ■ **पुणे संपर्क :** ८५५१०५५११३
■ **कोल्हापूर कार्यालय :** एस ९४६, GF-7, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर-४१६००२
■ **सांगली मुख्य कार्यालय :** कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली. ■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत)
■ संपादक : संजीव शाळगावकर



# हॅलो प्रभात

नवे विचार...नवी सुरुवात

RNI NO. MAHMAR/2020/79996

संपादक : संजीव शाळगांवकर

▪ मुंबई ▪ पुणे ▪ सांगली ▪ कोल्हापूर ▪ सातारा ▪ सोलापूर ▪ अहिल्यानगर

हॅलो प्रभात LIVE

Hello Prabhat Media

Print - Electronic - Social

**पुणे** ▪ वर्ष : ०६ ▪ अंक : ३५१ ▪ शनिवार, २८ मार्च २०२६ ▪ किंमत : ३ रुपये ▪ पाने : ४


# पोलीस दलाच्या बळकटीकरणासाठी भरीव निधी देऊ : पालकमंत्री चंद्रकांत पाटील

## पोलीस दलाच्या सात विकासकामांचे भूमिपूजन : ४ कोटी ३४ लाखांचा निधी मंजूर

**सांगली : हॅलो प्रभात**

पोलीस दलाच्या सात कामांसाठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) मधून ४ कोटी ३४ लाख १६ हजार १९३ रूपये निधीची तरतूद करण्यात आली आहे. यापुढेही पोलीस दलाच्या बळकटीकरणासाठी भरीव निधी वेळोवेळी उपलब्ध करून देण्यात येईल, अशी ग्वाही राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण, संसदीय कार्य मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२५-२६ च्या निधीतून मंजूर सांगली जिल्हा पोलीस दलाकडील विविध विकासकामाच्या भूमिपूजन प्रसंगी ते बोलत होते. पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर आयोजित या कार्यक्रमास आमदार डॉ. सुरेश खाडे, आमदार सुधीर गाडगीळ, जिल्हाधिकारी अशोक काकडे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे, महापालिका आयुक्त सत्यम गांधी, पोलीस अधीक्षक संदीप घुगे, जिल्हा




नियोजन अधिकारी अशोक पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता क्रांतीकुमार मिरजकर, पालकमंत्री यांचे विशेष कार्य अधिकारी बाळासाहेब यादव आदि मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. पालकमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, कायदा व सुव्यवस्था नीट ठेवण्यासाठी पोलीस दलाला पायाभूत सुविधा, अद्ययावत तंत्रज्ञान व वाहने उपलब्ध करून देऊ. मुंबईत शासकीय व खाजगी सीसीटीव्ही असे एकत्र जाळे करण्यात येत असून, त्यामुळे गुन्हेउकल करण्यास मदत होणार आहे. सांगली जिल्ह्यातही ब्लॅक स्पॉटस्च्या ठिकाणी वीजव्यवस्था, सीसीटीव्ही व्यवस्था, अतिक्रमण हटाव यासाठी महानगरपालिका व जिल्हा वार्षिक योजनेच्या एकत्रित निधीतून कार्यवाही करावी, असे त्यांनी सूचित केले.

पुढे चंद्रकांत पाटील म्हणाले, कालानुरूप अद्ययावत तंत्रज्ञानाच्या वापरातून २४ तासात गुन्हेउकल व दोषसिद्धीच्या अनुषंगाने पोलीस दल चांगले काम करत आहे. मात्र, कायद्याचा धाक निर्माण करण्यासाठी अधिक कडक उपाययोजना कराव्यात. पोलीस विभागाने गस्त वाढवावी. विविध पथकांनी कायद्याची दहशत निर्माण करावी, अशी अपेक्षा व्यक्त करून पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी जिल्हा वार्षिक योजनेतून मंजूर स्थापत्य स्वरूपाच्या कामे ठेकेदारांनी अद्ययावत तंत्रज्ञान वापरून दर्जेदार व विहित वेळेत पूर्ण करावीत.

प्रास्ताविकात पोलीस अधीक्षक संदीप घुगे यांनी भूमिपूजन झालेल्या कामांची सविस्तर माहिती, त्यांची गरज व त्यासाठी जिल्हा नियोजन समितीमधून निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल ऋणनिर्देश व्यक्त केले. तसेच, यातून कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट करण्यास मदत होणार असून, दोषसिद्धी वाढून गुन्हेगारीस आळा बसेल, असे ते म्हणाले.

यावेळी पालकमंत्री चंद्रकांत पाटील व मान्यवरांच्या हस्ते कुदळ मारून विविध कामांचे भूमिपूजन करण्यात आले. तसेच, कोनशीलेचे अनावरण करण्यात आले. सूत्रसंचालन वाहतूक पोलीस निरीक्षक मुकुंद कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमास पोलीस विभागातील अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सांगली जिल्ह्यात शिवसेना बळकट करण्यावर भर : दगडू सपकाळ



**वाळवा : हॅलो प्रभात**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण महाराष्ट्रात शिवसेना पक्ष जोर धरत आहे. पश्चिम महाराष्ट्रात संघटन बळकट झाले असून, विविध राजकीय पक्षांतील आणि स्थानिक घटकातील अनेकांनी पक्षात प्रवेश केला आहे असे माजी आमदार आणि शिवसेना पश्चिम महाराष्ट्र संपर्कप्रमुख दगडू सपकाळ यांनी सांगितले.

वाळवा तालुक्यात जिल्हा परिषद निवडणुकीत गौरव नायकवडी यांच्या नेतृत्वाखाली मिळालेले यश अभूतपूर्व असल्याचे सपकाळ यांनी नमूद केले. त्यांनी सांगितले की, सांगली जिल्ह्यात शिवसेना बळकट करण्यासाठी स्थानिक पदाधिकाऱ्यांनी शहरी व ग्रामीण भागातील समस्यांवर प्राधान्य दिले पाहिजे.यावेळी गौरव नायकवडी म्हणाले की, सांगली जिल्ह्यात शिवसेना वाढीसाठी पोषक वातावरण आहे. स्थानिक युवकांचा पक्षात समावेश करण्यासाठी विशेष प्रयत्न केला जातील. आगामी काळात सांगलीत शिवसेना नंबर एक पक्ष बनवण्याचे आमचे उद्दिष्ट आहे.कार्यक्रमात शशिकांत निकम, जि.प.सदस्य संताजी मेटकरी, महादेव पाटील, उमेश घोरपडे, बाळासाहेब पाटील, बाळासो यादव, दत्ता चव्हाण, सनी अहिर तसेच विविध संस्थांचे आजी-माजी पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संक्षिप्त...

## कोल्हापूरची हद्दवाढ राजकारणात लटकली

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

तब्बल ५४ वर्षे उलटली तरी अद्याप एक इंचही कोल्हापूरची हद्दवाढ झालेली नाही. केवळ राजकारणामुळे कोल्हापूरची हद्दवाढ रखडली आहे. त्यामुळे कोल्हापूरचा विकास खुंटला आहेच; त्याबरोबरच आजूबाजूच्या ग्रामीण भागही ठप्प झाला आहे. विकासाच्या आशा धुळीस मिळत असताना, लोकप्रतिनिधींनी आपापले राजकीय अजेंडे बाजूला ठेवून शहराच्या भवितव्याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. असे कोल्हापूरकरांतून बोलले जात आहे.

## हापूस आंब्याची आवक वाढली

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

मुंबईतील आंबा मार्केट डाऊन झाल्याने कोल्हापूरमध्ये हापूस आंब्याची आवक वाढली. गुरुवारी कोल्हापूर बाजार समितीत १९०० बॉक्स आंबा दाखल झाला. आवक वाढली असली तरी १००० ते १२०० रुपये प्रति डझन दर आहे. आठवडाभरानंतर आवक वाढेल त्यानंतर दर सर्वसामान्यांच्या आवाक्यात येईल, असा अंदाज व्यापाऱ्यांचा आहे. मुंबईला जाणाऱ्या काही बागायतदारांची पावले कोल्हापूरसह स्थानिक बाजारांकडे वळली आहेत. त्यामुळे सध्या स्थानिक बाजारात आंब्याची आवक वाढली आहे.

## जिल्ह्यात पेट्रोल, डिझेलचा मुबलक साठा

**सातारा : हॅलो प्रभात**

सातारा जिल्ह्यात पेट्रोल तसेच डिझेलचा पुरवठा सुरळीत सुरू असून इंधनसाठा मुबलक आहे. जिल्हा प्रशासन इंधन पुरवठ्यावर सतत लक्ष ठेवून आहे. यासंदर्भात इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लिमिटेड, हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड व भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड या तिनही ऑईल कंपन्यांचे सेल्स ऑफिसर यांनी जिल्ह्यात कोणत्याही प्रकारचा इंधन तुटवडा नसल्याचे सांगितले आहे. त्यामुळे नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये. तसेच इंधनाची साठेबाजी, काळाबाजार करताना सापडल्यास कारवाई करणार असल्याचा इशारा जिल्हा पुरवठा अधिकारी वैशाली राजमाने यांनी दिला आहे.

# डी.वाय.पी.विद्यापीठाचा क्वीन्सलँड युनिव्हर्सिटीसोबत सामंजस्य करार

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

डी.वाय.पाटील कृषी व तंत्र विद्यापीठ आणि जागतिक स्तरावरील अग्रगण्य असलेल्या ऑस्ट्रेलियाच्या क्वीन्सलँड युनिव्हर्सिटी यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे, यामुळे विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय शिक्षणासाठी नवे दालन खुले होईल असा विश्वास कुलपती डॉ. संजय डी. पाटील यांनी यावेळी व्यक्त केला.

या सामंजस्य करारामध्ये संयुक्त प्रकल्प, सहकार्यात्मक संशोधन, शैक्षणिक व वैज्ञानिक उपक्रम, ड्यूअल डिग्री प्रोग्राम्स, 'सेमिस्टर अब्रॉड', इंटिग्रेटेड लर्निंग, इन्क्युबेशन व स्टार्टअप हब्स, विद्यार्थी व प्राध्यापकांची देवाणघेवाण तसेच शैक्षणिक साहित्य व प्रकाशनांची देवाणघेवाण यांचा समावेश आहे. 'हँडूस-ऑन' शिक्षण, एकात्मिक शिक्षण, प्रत्यक्ष अनुभव, आंतरराष्ट्रीय इंटर्नशिप व स्टडी टूर यावर विशेष भर दिला जाणार आहे.जगातिक




विद्यापीठांच्या यादीत ३३ व्या क्रमांकावर असलेल्या क्वीन्सलँड युनिव्हर्सिटीमध्ये आर्किटेक्चर, बिझनेस, डिझाइन इंजिनिअरिंग, प्रोजेक्ट मॅनेजमेंट, रोबोटिक्स, मीडिया कम्युनिकेशन आणि प्रोसेसिंग इंजिनिअरिंग यांसारख्या विविध शाखांमध्ये पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम चालवले जातात. डी. वाय. पाटील ग्रुपच्या विद्यार्थ्यांना या करारामुळे जागतिक संधी उपलब्ध होणार आहेत.

यावेळी कुलपती डॉ. संजय डी.पाटील, कुलगुरू डॉ.ए.के.गुप्ता, रजिस्ट्रार डॉ.जयेन्द्र खोत त्याचबरोबर प्रा.अ‍ॅना डेलेटिक, प्रा. दीपक दुबल, प्रा.शिमुल हक, प्रा. अजय पांडे, असोसिएट प्रा. इंदिरा प्रसादम, प्रा. आशीष भास्कर, डॉ. मुरली भूपती, डॉ. संग्राम पाटील, डॉ. शिवानंद शिरकोळे, डॉ. जयदीप पाटील, डॉ. उत्कर्ष आवळेकर, डॉ. सदाशिव कल्याण आदी मान्यवरांच्या उपस्थित होते. कार्यक्रमात कुलगुरू डॉ. ए. के. गुप्ता यांनी डी. वाय. पाटील समूहाच्या शैक्षणिक प्रवासाचा व शिक्षण क्षेत्रातील योगदानाचा आणि विद्यापीठाच्या कार्याची माहिती दिली. प्रा.अ‍ॅना डेलेटिक व प्रा. दीपक दुबल यांनी क्वीन्सलँड युनिव्हर्सिटीबाबत माहिती सादर केली. डॉ. जयेन्द्र ए. खोत यांनी आभार मानले.

कुलपती डॉ. संजय डी. पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष आ.सतेज डी.पाटील, प्र-कुलपती ऋतुराज संजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा करार करण्यात आला.

# लॉकडाऊनची अफवा पसरवाल तर खबरदार!

## फडणवीसांचा अफवांवर स्पष्ट इशारा

**पुणे : हॅलो प्रभात**

अमेरिका-इराण तणावाच्या पार्श्वभूमीवर इंधन पुरवठ्याबाबत उद्भवलेल्या अफवांबाबत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले की, देशात पेट्रोल-डिझेल पुरेसा उपलब्ध आहे आणि कोणतीही टंचाई नाही. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असं त्यांनी आवाहन केलं.

मुख्यमंत्र्यांनी सांगितलं की, पेट्रोल आणि डिझेलवरील एक्साईज ड्युटी १० रुपये कमी केली असून, कच्च्या तेलाच्या वाढलेल्या किमतींचा भार नागरिकांवर पडणार नाही. लॉकडाऊन लागू होणार नाही, अशा अफवा पसरविणाऱ्यावर फौजदारी कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी



दिला. त्याचबरोबर फडणवीस यांनी राज्यातील आरोग्य सुविधांवर भाष्य करत महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत दर्जेदार आरोग्य सेवा प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले.

## जयसिंगपूरात महिला अत्याचार प्रकरण

# 'सोनू महाराज' यांचा संबंध नसल्याचे स्पष्टीकरण

**जयसिंगपूर : हॅलो प्रभात**

शहरातील १२ वी गल्ली परिसरात सुमारे दोन महिन्यांपूर्वी घडलेल्या महिला अत्याचार प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे. या घटनेत जाभळी (ता. शिरोळ) येथील 'सोनू महाराज' यांचा कोणताही संबंध नसल्याचे तपासातून स्पष्ट झाले आहे. या प्रकरणाशी 'सोनू महाराज' यांचे नाव जोडत काही ठिकाणी अफवा पसरवल्या जात असल्याने त्यांच्या प्रतिमेला धक्का बसत असल्याची चर्चा शहरात सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तपास यंत्रणांनी या प्रकरणाचा सखोल अभ्यास केला असता 'सोनू महाराज' यांचा थेट किंवा अप्रत्यक्ष सहभाग आढळून आलेला नाही. मात्र, काही समाजकंटकांकडून जाणीवपूर्वक त्यांचे नाव या प्रकरणाशी जोडून चुकीची व दिशाभूल करणारी माहिती प्रसारित केली जात असल्याचे समोर आले आहे.

या अफवांमुळे समाजात गैरसमज पसरत असून संबंधित व्यक्तीच्या सामाजिक प्रतिष्ठेवर परिणाम होत असल्याचेही निदर्शनास आले आहे.

दरम्यान, या प्रकरणी तपास यंत्रणांकडून आवश्यक ती सर्व पावले उचलली जात असून, सत्य समोर आणण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

या पार्श्वभूमीवर स्थानिक नागरिकांमध्ये अफवांबाबत नाराजी व्यक्त होत असून, अप्रमाणित व दिशाभूल करणाऱ्या बातम्या पसरविणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. अशा अफवांमुळे समाजात तणाव निर्माण होऊ शकतो, त्यामुळे प्रशासनानेही याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे.

# 'इग्नायटेड इनोव्हेटर्स' स्पर्धेत अनंतराव पवार महाविद्यालयाचे विद्यार्थी चमकले

**पुणे : हॅलो प्रभात**

अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड रिसर्च विद्यार्थ्यांनी 'इग्नायटेड इनोव्हेटर्स ऑफ इंडिया (I2I)' टेक्नो-सोशल स्पर्धेत प्रादेशिक अंतिम फेरीत दोन पुरस्कार जिंकून महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले. मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील हर्षवर्धन चिंचोलकर, अविनाश पवार आणि प्रिया शिंदे यांनी "इलेक्ट्रिक वाहनासाठी कार्यक्षम बॅटरी व्यवस्थापन प्रणालीचे डिझाइन" प्रकल्पाद्वारे इनोव्हेशन कॅटेगरीमध्ये प्रथम क्रमांक मिळवला. तर जिगिषा जानुगडे, शिवानी सावंत, अथर्व घाग आणि किरण भामे यांनी "३डी प्रिंटेड प्रोस्थेटिक फिंगर जॉइंटच्या यांत्रिक गुणधर्मांची सुधारणा" प्रकल्पाद्वारे पीपल्स चॉईस पुरस्कार जिंकला.

या प्रकल्पांचे मार्गदर्शन प्रा. निलेश जाधव आणि



प्रा. संपदा अहिरराव यांनी केले. पुरस्कार वितरण समारंभास सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. सुनील भिरुड, भाऊ इन्स्टिट्यूटचे सह-संस्थापक संजय इनामदार, क्विक हील टेक्नॉलॉजीचे संस्थापक कैलाश काटकर, इटन कंपनीचे मॅनेजर सागर चव्हाण तसेच भाऊ इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र हिरेमठ उपस्थित होते. अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या सरचिटणीस प्रमिला गायकवाड यांनी विभागप्रमुख, प्राचार्य आणि विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# अनंतराव पवार अभियांत्रिकीची 'जायंट मीटरवेव्ह' कंपनीस भेट




**पुणे : हॅलो प्रभात**

अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड रिसर्च इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलीकम्युनिकेशन इंजिनीअरिंग विभागाच्या विद्यार्थ्यांनी नारायणगाव येथील जायंट मीटरवेव्ह रेडिओ टेलिस्कोप कंपनीत औद्योगिक अभ्यास दौरा पार पाडला. या दौऱ्यात विद्यार्थ्यांना अँटेना कॉन्फिगरेशन, डिझाईन ब्रेकथ्रू, इलेक्ट्रॉनिक फ्रंट-एंड व बॅक-एंड प्रणाली तसेच रेडिओ खगोलशास्त्रातील अभियांत्रिकी अंमलबजावणीबद्दल प्रत्यक्ष माहिती मिळाली. त्यांनी अँटेना अ‍ॅरे, कंट्रोल रूम व सिग्नल प्रोसेसिंग युनिट्स पाहून सिद्धांत आणि प्रत्यक्ष कामातील दुवा अनुभवला.औद्योगिक भेटीचे आयोजन प्रा. अनिल नाईकवाडे, प्रा. अश्विनी सूर्यवंशी आणि प्रा. शिवकन्या रसाळ यांनी केले, तर विभागप्रमुख डॉ. अमर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्य डॉ. सुनील ठाकरे यांनी सहलीचे नियोजन केले. विद्यार्थ्यांना प्रा. शिवकन्या रसाळ, प्रा. वैशाली भिमटे व प्रा. शरद जगताप यांनी मार्गदर्शन केले.अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या सरचिटणीस प्रमिला गायकवाड यांनी या औद्योगिक भेटीसाठी सर्वांचे अभिनंदन केले.

# विद्यार्थ्यांनी देशाच्या विकासाठी संरचनात्मक अंमलबजावणी अंगीकारावी

## डॉ. वेंकटेश्वरा शर्मा : आरआयटीत आंतरराष्ट्रीय परिषद संपन्न

**ईश्वरपूर : हॅलो प्रभात**

राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीत "सस्टेनेबल मॅनेजमेंट अँड ॲडव्हान्स्ड रिसर्च टेक्नॉलॉजी" विषयावर आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन इसरो बंगलोरचे डायरेक्टर डॉ. वेंकटेश्वरा शर्मा यांच्या शुभहस्ते आणि तैवान दूतावासाचे प्रमुख डॉ. लंग हेन यांग, माजी मंत्री जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले.

डॉ. शर्मा म्हणाले की, देशाचा शाश्वत विकास विद्यार्थ्यांच्या कार्यक्षमतेवर अवलंबून आहे. तरुणांनी शिस्तबद्ध आणि क्रियाशील नागरिक म्हणून तयार होऊन देशाच्या लौकिकात भर घालावी.परिषदेच्या




निमित्ताने अमेरिका, जपान, युके, जर्मनी, फ्रान्स, मलेशिया, तैवान, स्वीडन, व्हिएतनाम, स्पेन आणि भारतातील शिक्षण, संशोधन व औद्योगिक क्षेत्रातील ५०० पेक्षा अधिक तज्ञ, संशोधक, उद्योजक व विद्यार्थी सहभागी झाले.

आरआयटी महाविद्यालयाचे डायरेक्टर डॉ. पी. व्ही. कडोले यांनी सांगितले की, परिषदेच्या माध्यमातून विद्यार्थी आणि शिक्षकांना जागतिक व्यासपीठावर संशोधनाचे ज्ञान मिळेल.याप्रसंगी कासेगाव शिक्षण संस्थेचे सचिव आर डी सावंत आणि आरआयटीच्या नियामक मंडळाचे सदस्य शामराव पाटील उपास्थीत होते. कार्यक्रमाचे स्वागत आणि प्रास्ताविक आंतराष्ट्रीय परिषदेचे कन्व्हेनर डॉ व्ही एच कलमानी यांनी केले आणि आभार आंतराष्ट्रीय परिषदेचे सेक्रेटरी डॉ आर जी देसावळे यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रियांका जाधव, डॉ योगिनी कुलकर्णी आणि प्रा.गौतमी शिंगण यांनी केले.

# शेतकऱ्यांना २ लाख प्रोत्साहन अनुदान द्यावे

ईश्वरपूर : हॅलो प्रभात

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेतून शेतकऱ्यांना देण्यात येणारे ५० हजारांचे प्रोत्साहन अनुदान वाढवून २ लाख रुपये करावे, या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) पक्षाच्या वतीने ईश्वरपूर येथे मोर्चा काढण्यात आला. यावेळी प्रांताधिकारी श्रीनिवास अर्जुन यांना निवेदन देण्यात आले.




शरदचंद्र पवार गट पक्षाची मागणी : प्रांताधिकारी श्रीनिवास अर्जुन यांना निवेदन

मोर्चाचे नेतृत्व तालुकाध्यक्ष विजयराव पाटील, सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक वैभव शिंदे, पंचायत समिती सभापती उदय पाटील, नगराध्यक्ष आनंदराव मलगुंडे, जिल्हा सरचिटणीस बाळासाहेब पाटील, शहराध्यक्ष शहाजी पाटील, महिला जिल्हाध्यक्षा सुस्मिता जाधव, तालुकाध्यक्षा सुनिता देशमाने, युवक तालुकाध्यक्ष संग्राम जाधव, कार्याध्यक्ष देवराज देशमुख यांनी केले. रखरखत्या उन्हातही मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी झाले होते.

यावेळी बोलताना वैभव शिंदे म्हणाले, "सरकारने शेतकऱ्यांचा सात-बारा कोरा करण्याचे आश्वासन दिले होते, मात्र ते अद्याप पूर्ण झालेले नाही. किमान नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना दोन लाखांचे प्रोत्साहन अनुदान द्यावे.विजयराव पाटील म्हणाले, आमचे नेते शरदचंद्र पवार यांनी देशातील शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर कर्जमाफी दिली होती. सध्या शेती परवडत नसून शेतकरी अडचणीत आहे. नियमित कर्ज भरणाऱ्यांचा सन्मान व्हावा.

उदय पाटील यांनी सरकारवर टीका करताना म्हटले की, मोठ्या उद्योगपतींची कोट्यवधी रुपयांची कर्जे माफ केली जातात, मग शेतकऱ्यांवर अन्याय का? सुस्मिता जाधव यांनीही सरकारच्या धोरणांवर टीका केली.

यावेळी संग्राम जाधव, देवराज देशमुख, अरुण कांबळे, मकरंद पाटील, अक्षय पाटील यांनीही राज्य सरकारचा निषेध नोंदवला.मोर्चात उपनगराध्यक्ष खंडेराव जाधव, उपसभापती प्रकाश पाटील, बँकेचे उपाध्यक्ष माणिकराव पाटील, विविध संस्थांचे पदाधिकारी तसेच मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

## रामनवमीला ११ हजार दिव्यांचा दिपोत्सव



सांगली : हॅलो प्रभात

रामनवमीच्या निमित्ताने कृष्णाकाठ आणि माई घाट येथे ५१ फूटी प्रभू श्रीरामाच्या प्रतिमेसमोर ११ हजार १११ दिव्यांचा भव्य दिपोत्सव आयोजित करण्यात आला. पृथ्वीराज पाटील फाऊंडेशनच्या वतीने संस्कार भारती आणि ज्ञानमंथन संस्थांच्या सहकार्याने आयोजित या सोहळ्यात भक्तीगीत, महाआरती, आतिषबाजी आणि कलाकारांची रंगलेली मैफल झाल्याने सांगलीकरांनी 'जय श्रीराम' अशा जयजयकारात रामभक्तीचा अनुभव घेतला.

भाजपा नेते पृथ्वीराज पाटील यांनी सांगितले की, हा उपक्रम राष्ट्रीय ऐक्य, त्याग आणि संयमाचे प्रतीक असून सांगलीकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी स्थानिक नेते, पुरोहित, शिक्षक, विद्यार्थी आणि विविध क्षेत्रातील रामभक्त उपस्थित होते.

## भारुडाने घाटनांद्रे पारायणाची यशस्वी सांगता

कवठेमहांकाळ : हॅलो प्रभात

सालाबादप्रमाणे याही वर्षी गुढीपाडव्या पासून सुरू झालेल्या घाटनांद्रे (ता कवठेमहांकळ) येथील अखंड हरिनाम सप्ताह तथा श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याची सांगता ही गोविंद गायकवाड महाराज देवाची आळंदी यांच्या जनकल्याण भारुड मंडळाच्या बहारदार भारुडाच्या कार्यक्रमाने झाली.यावेळी घाटनांद्रे व पंचक्रोशीतील भाविकभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर पारायणा दरम्याने येथे विविध प्रकारच्या धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल दिसून आली.यामध्ये नित्यनेमाने ज्ञानेश्वरी वाचन,आरती, भजन,कीर्तन,जागर,प्रवचन,काकडा,हरीपाठ वाचन या सारखे धार्मिक कार्यक्रम पार पडले. तर हभप सागर बोराटे,विठ्ठल चौरे, मोहन घोटीकर,अविनाश भारती,आनंद जाधव,एकनाथ उपलानी यांची किर्तने तर हभप विठ्ठल पाटील,गुलाब शिंदे, मोहन पाटील,राणू मालक, संजय शेटे यांची दृतकाव्य अशी प्रवचने पार पडली. तर सोहळ्याची सांगता ही सकाळी ग्रंथ दिंडी व पालखी सोहळा,आकरा वाजता हभप विठ्ठल पाटील महाराज शेटफळे-करमाळा यांचे काल्याचे किर्तन झाले.तदनंतर महाप्रसाद वाटप व रात्री नऊ वाजता गोविंद गायकवाड महाराज देवाची आळंदी यांच्या बहारदार भारुडाने करण्यात आली.यावेळी भाविकभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्रीराम मंदिरात रामनवमी उत्साहात



आष्टा : हॅलो प्रभात

येथील झंवर कुटुंबीयांच्या वतीने श्रीराम मंदिरात रामनवमी उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. श्रीराम जय राम जय जय रामचा जयघोष करण्यात आला. यावेळी मंदिर आकर्षक फुलांनी तसेच विद्युत रोषणाईने सजवण्यात आले होते. आष्टा शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी पुरातन असे श्रीराम मंदिर आहे. या मंदिरात प्रतिवर्षी रामनवमी व कृष्ण जन्माष्टमी उत्साहात साजरी करण्यात येते. श्रीराम नवमी निमित्त गुरुवार, दि. १९ ते २४ अखेर विविध धार्मिक कार्यक्रम झाले. दररोज पहाटे 'श्री'चा अभिषेक व पूजा. सकाळी प्रकाश महाजन व प्रमोद साळुंखे यांच्या कल्लेश्वर सत्संग मंडळाच्या वतीने वैदिक शांती मंत्र व श्रीरामचरितमानस कथा , प्राचार्य गजानन बुवा कुलकर्णी यांचे सुमधुर कीर्तन . सुहास दिवेकर व सहकारी यांचे गीतरामायण झाले. गुरुवारी दुपारी १२:३० वाजता 'श्री'चा जन्मकाळ कीर्तन पाळणा गीत व आरती झाल्यानंतर भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. सायंकाळी 'श्री'चा पालखी सोहळा झाला. यावेळी आष्टा कोल्हापूर व इचलकरंजी येथील झंवर कुटुंबातील महिलांनी श्रीरामांचे पाळणा गीत सादर केले श्रीराम नवमीच्या कार्यक्रमाला आष्टा शहरातील विविध मान्यवर उपस्थित होते.

## जिल्ह्यात शिक्षण अधिक दर्जेदार होण्यासाठी विशेष लक्ष देणार : संगीता पाटील

आष्टा : हॅलो प्रभात



सांगली जिल्हा परिषदेच्या नूतन जिल्हा परिषद अध्यक्षा सौ.संगीता पाटील यांचा प्रहार शिक्षक संघटनेच्यावतीने सत्कार करण्यात आला.त्यावेळी पुढे बोलताना तलवकरच शिक्षण विभागाची व्यापक बैठक लावून शिक्षकांच्या समस्या दूर करणार असल्याचे आश्वासन दिले. जिल्हा परिषद शाळांमध्ये गोरगरिबांच्या आणि सामान्यांच्या मुलांना उत्कृष्ट शिक्षण मिळतच आहे. तो दर्जा अधिकच वाढण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी बोलताना संभाजी पाटील म्हणाले की शिक्षण हा समाजाचा पाया आहे. त्यावरती लक्ष केंद्रित करण्यात येईल. मॉडेल स्कुल अजून विस्तारित करण्यात येतील..यावेळी आपल्या भावना व्यक्त करताना जिल्हा अध्यक्ष श्री चंद्रशेखर क्षीरसागर यांनी विद्यार्थीप्रिय शिक्षण व शिक्षक प्रश्न यावरती सविस्तर माहिती दिली.शिक्षकांना भेडसावणाऱ्या समस्या दूर करण्याची मागणी केली.यावेळी श्री संभाजीराव पाटील,सरचिटणीस अमोल जाधव, कार्याध्यक्ष श्री रामराव पाटील, महिला आघाडी प्रमुख अनिता कदम, सुरेखा औताडे, बागेश्री शिंदे, सुरेखा पाटील, संजय भोसले, सचिन बामणे, शिवाजीराव साळुंखे,राजेश जोशी, रवींद्र लोंढे , विजय लोहार,रवींद्र पवार अमोल कुंभार, उमेश वर्णे व इतर उपस्थित होते.

## दिपक रणदिवे यांची आदर्श कलाशिक्षक पुरस्कारासाठी निवड

### नवनवीन उपक्रम राबवणारे आणि विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून ओळख

सांगली : हॅलो प्रभात



महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे मान्यता प्राप्त महाराष्ट्र राज्य कलाध्यापक संघ महामंडळ व सातारा कलाध्यापक संघ यांच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी दिला जाणारा राज्यस्तरीय आदर्श कलाध्यापक पुरस्कार रयत शिक्षण संस्थेच्या दाजी पाटलोजी विद्यालय व श्रीरंग दाजी देवकर ज्युनिअर कॉलेज, वेजेगाव (ता. खानापूर) येथील उपक्रमशील कलाशिक्षक दीपक रणदिवे यांना जाहीर झाला आहे.

विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी सातत्याने नवनवीन उपक्रम राबवणारे आणि विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून रणदिवे सर ओळखले जातात. कला विषयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना भविष्यातील संधी आणि व्यावसायिक दृष्टिकोन याबाबत ते नियमित मार्गदर्शन करतात.

चित्रकला स्पर्धा, शासकीय ग्रेड परीक्षा, पोस्टर स्पर्धा, रांगोळी स्पर्धा तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून त्यांनी विद्यार्थ्यांना व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. कला विषयाच्या प्रसार आणि जनजागृतीसाठीही ते सातत्याने प्रयत्नशील आहेत.या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना हा राज्यस्तरीय सन्मान जाहीर करण्यात आला असून, त्यांच्या निवडीबद्दल विविध स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. दरम्यान, या पुरस्कारामुळे जबाबदारी आणखी वाढली असून भविष्यातही विद्यार्थ्यांसाठी अधिक प्रभावी काम करण्याचा प्रयत्न राहील,अशी भावना रणदिवे यांनी व्यक्त केली.



### डॉ. राजेंद्र मेथे यांचा सेवानिवृत्ती शुभेच्छा समारंभ

मिरज : हॅलो प्रभात

गुलाबराव पाटील होमिओपॅथीक मेडिकल कॉलेजचे प्राचार्य डॉ. राजेंद्र मेथे ३४ वर्षांच्या सेवा कालावधी नंतर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यांच्या योगदानासाठी संस्थापक चेअरमन पृथ्वीराज पाटील यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. मेथे यांनी कॉलेजच्या स्थापनेपासून प्राध्यापक व प्राचार्य म्हणून महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली असून, विद्यार्थ्यांचा विकास आणि कर्मचारी कल्याणासाठी त्यांनी सतत प्रयत्न केले. कार्यक्रमात संस्था पदाधिकारी, शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## युवकांना दिशा देणारा कुरळप पोलिसांचा उपक्रम

ईश्वरपूर : हॅलो प्रभात



कुरळप (ता.वाळवा) येथे कुरळप पोलीस ठाण्याच्या वतीने शांततेसाठी क्रिकेट स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून, या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. या स्पर्धेला सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेचे माजी उपाध्यक्ष रणधीर नाईक यांनी सदिच्छा भेट देत खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

यावेळी बोलताना नाईक म्हणाले की, महाराष्ट्रात युवकांना योग्य दिशा आणि प्रेरणा देणारा हा एक वेगळा आणि स्तुत्य उपक्रम आहे. कुरळप पोलीस ठाण्याचे एपीआय विक्रम पाटील यांनी पुढाकार घेऊन ग्रामीण भागात शांतता राखण्यासाठी आणि युवकांमध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण करण्यासाठी क्रिकेट स्पर्धांचे आयोजन केले आहे.

ते पुढे म्हणाले, पोलिसांच्या माध्यमातून अशा प्रकारे क्रीडा स्पर्धा आयोजित करून युवकांमध्ये समन्वय साधण्याचा प्रयत्न प्रथमच पाहायला मिळत आहे. खेळाडूंनी खेळ भावना जपून खेळावे आणि या माध्यमातून एकमेकांशी संवाद वाढवावा. गावागावांमध्ये शांतता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी तरुण पिढीने पुढाकार घेणे गरजेचे आहे. या उपक्रमासाठी कुरळप पोलीस ठाण्याचे एपीआय विक्रम पाटील व त्यांच्या संपूर्ण स्टाफने घेतलेल्या परिश्रमांचेही नाईक यांनी कौतुक करत आभार मानले.

## मथुबाई गरवारे मध्ये अर्थवेध भित्तीपत्रिकेचे उद्घाटन

सांगली : हॅलो प्रभात

श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय येथे अर्थशास्त्र विभागाच्या 'अर्थवेध' या भित्तीपत्रिकेचे उद्घाटन उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. माधव नगर, सांगली येथील प्रसिद्ध उद्योजिका नेहा डोडिया यांच्या हस्ते या भित्तीपत्रिकेचे उद्घाटन करण्यात आले.



अर्थशास्त्र विभागाची भित्तीपत्रिका दरवर्षी विविध समकालीन विषयांवर विद्यार्थिनींनी तयार केलेली असते. यामध्ये अर्थशास्त्राशी निगडित विविध विषयांवर अभ्यासपूर्ण लेखन केले जाते. यावर्षी भित्तीपत्रिकेचा विषय "भारतामधील विविध खाद्यान्नांचा आंतरराष्ट्रीय व्यापार" असा असून पदवी व पदव्युत्तर विभागातील विद्यार्थिनींनी बासमती तांदूळ, हळद, विविध मसाले, चहा, कॉफी, मिठाई तसेच विविध राज्यांतील खाद्यपदार्थांच्या आंतरराष्ट्रीय व्यापारावर सखोल लेख सादर केले.

या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. अनिल सुगते, उपप्राचार्य व भित्तीपत्रिका विभागाच्या समन्वयक डॉ. नंदिनी काळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकवृंद आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमातील मान्यवरांचे स्वागत अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रोहिणी देशपांडे यांनी केले. प्रस्ताविक व सूत्रसंचालन प्रा. मनीषा हाके यांनी प्रभावीपणे पार पाडले.

भित्तीपत्रिकेच्या विषयाला अनुसरून विद्यार्थ्यांनी दोन आकर्षक शैक्षणिक मॉडेल्स तयार केली होती. त्यांचे सादरीकरणही यावेळी करण्यात आले, ज्यास उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली. कार्यक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये संशोधनवृत्ती, सर्जनशीलता आणि जागतिक आर्थिक घडामोडींबाबतची जाणीव अधिक दृढ झाली. कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडल्याबद्दल सर्व स्तरांतून समाधान व्यक्त करण्यात आले.

## संकटग्रस्तांच्या पाठीशी प्रशासन खंबीर : महापौर सूर्यवंशी

मिरज : हॅलो प्रभात



येथील ईदगाह माळ परिसरात झालेल्या मुसळधार पावसामुळे मोठे वृक्ष कोसळून अनेक घरांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या नैसर्गिक आपत्तीच्या पार्श्वभूमीवर बाधित नागरिकांच्या मदतीसाठी प्रशासन तत्परतेने कार्यरत असल्याची ग्वाही सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिकेचे महापौर धीरज सूर्यवंशी यांनी दिली.

श्री.सूर्यवंशी यांनी आज ईदगाह माळ परिसराला प्रत्यक्ष भेट देऊन नुकसानीची पाहणी केली. यावेळी त्यांनी बाधित कुटुंबांशी संवाद साधत त्यांना धीर दिला. "या कठीण काळात कोणालाही वाऱ्यावर सोडले जाणार नाही. प्रशासन आणि लोकप्रतिनिधी मिळून सर्वांना मदत करू,असे त्यांनी सांगितले. महानगरपालिकेकडून नुकसानीचे पंचनामे करण्याचे काम सुरू असून, तातडीने आवश्यक मदत देण्याबाबतही कार्यवाही सुरू असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## स्व.प्रतापशेठ साळुंखे हे समाजासाठी खरे दीपस्तंभ : संकेत कुंभार

विटा : हॅलो प्रभात

स्व. प्रतापशेठ (दादा) साळुंखे यांच्या ८६ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी दादांच्या समाजकार्याची आठवण करून त्यांचे कार्य कृतज्ञतेने स्मरण केले गेले. उपस्थितांनी नमूद केले की, दादांच्या कार्यामुळे अनेकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडले असून, आजही त्यांचा प्रभाव समाजात जाणवतो. यावेळी नुकतेच भारतीय महसूल सेवामध्ये यश संपादन केलेले संकेत कुंभार यांचा सत्कार करण्यात आला. त्यांनी मनोगतात सांगितले, "स्व. प्रतापशेठ (दादा) साळुंखे हे समाजासाठी खरे दीपस्तंभ होते." त्यांनी तरुणांना दादांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन समाजासाठी योगदान देण्याचे आवाहन केले.



कार्यक्रमात शिवप्रताप मल्टीस्टेट चे कार्यकारी संचालक ॲड. मा. विठ्ठलराव साळुंखे यांनी दादांच्या जीवनप्रवासाचा सविस्तर आढावा घेतला. त्यांनी बालपणातील परिस्थिती, संघर्षातून वाटचाल, व्यवसायातील यश आणि समाजासाठी केलेल्या उपक्रमांचा उल्लेख केला. त्यांनी सांगितले की, दादांनी कठीण परिस्थितीतून उभे राहून अनेकांना आधार दिला आणि समाजात विश्वास निर्माण केला.यावेळी नूतन जिल्हा परिषद सदस्य हिम्मतराव जाधव यांनी दादांच्या राजकीय जीवनाचा उल्लेख करत त्यांच्या नेतृत्वगुणांची दखल घेतली. तसेच, प्रभाकर सगरे यांनी शिवप्रताप मल्टीस्टेट पतसंस्थेद्वारे दादांच्या आर्थिक सहाय्य आणि समाजातील दुर्बल घटकांना सक्षम करण्याच्या कार्याचे कौतुक केले.

ॲड. बाबासाहेब मुळीक यांनी दादांच्या शैक्षणिक क्षेत्रातील योगदानावर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना दिलेल्या मदतीचा आणि शैक्षणिक उपक्रमांचा उल्लेख केला. यामुळे अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळाली आणि त्यांचे भविष्य घडले. कार्यक्रमात यापूर्वी आयोजित केलेल्या चित्रकला स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले. स्वागताची जबाबदारी गणेश बाबर यांनी, सूत्रसंचालन तेजस्वी पाटील यांनी तर आभार हणमंत पाटील यांनी मानले. कार्यक्रमाच्या निमित्ताने दादांचे कार्य, विचार आणि समाजातील योगदान पुन्हा एकदा स्मरणात आणले गेले. उपस्थितांनी त्यांच्या कार्याचा आदर्श ठेवून समाजासाठी कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवर, पदाधिकारी, महिला, विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## घाटनांद्रेत रामनवमी उत्साहात




कवठेमहांकाळ : हॅलो प्रभात

घाटनांद्रे (ता.कवठेमहांकाळ) येथे सालाबादप्रमाणे याही वर्षी जगन्नाथ पांडुरंग सुतार यांच्या घरी रामनवमी उत्सव अगदी उत्साहात साजरा करण्यात आला.अगदी सकाळ पासूनच सदर परिसरात उत्सवाची लगबग दिसून येत होती.

अगदी सकाळ पासूनच गावातील सर्व भजनी मंडळांचा एकत्रित भजनाचा कार्यक्रम झाला.तदनंतर विधीवतपणे प्रतिमा पूजन होऊन,आरती करण्यात आली.यावेळी सामुदायिपणे महीलांनी रामजन्माचा पाळणाही गायला.शेवटी महाप्रसाद वाटपाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.कार्यक्रमाचे संपूर्ण संयोजन जगन्नाथ सुतार, ओंकार सुतार कुटुंबियांनी व मित्रपरिवारांनी केले.यावेळी भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'फेमसली फिट' फिटनेस सिरीज ॲमेझॉन एमएक्स प्लेयरवर




**मुंबई : हॅलो प्रभात** : ॲमेझॉन एमएक्स प्लेयर या भारतातील आघाडीची विनामूल्य, प्रीमियम, जाहिरात-समर्थित व्हिडिओ स्ट्रीमिंग सेवेने आज फिटनेस शो फेमसली फिट हा एक पूर्णपणे नवीन साप्ताहिक फिटनेस आणि जीवनशैली शो प्रदर्शित केला. सोफी चौधरी ने सूत्रसंचालन केलेल्या या सहा एपिसोडच्या सिरीजमध्ये तंदुरुस्ती, प्रसिद्धी आणि स्पष्ट संभाषण निराळीच उंची गाठणार. ज्यामुळे प्रेक्षकांना भारतातील काही सर्वात लोकप्रिय सेलिब्रिटींमागील दिनचर्या आणि कथांवर एक अनफ़िल्टर्ड दृष्टीकोन मिळतो. प्रत्येक भागामध्ये एक ए-लिस्ट सेलिब्रिटी रेड कार्पेटपासून दूर जाऊन एका वर्कआऊट सेटअपमध्ये पाऊल ठेवतो. या सिरीजची सुरुवात आज देशातील सर्वाधिक चर्चेत असलेल्या अभिनेत्रींपैकी एक, क्रिती सॅनन, त्यानंतर फिटनेस आयकॉन आणि सदाबहार मलायका अरोरा तसेच प्रचंड लोकप्रिय आणि कायम प्रेक्षक पसंतीस उतरलेली सोनम बाजवा यांच्याद्वारे होते. या श्रेणीमध्ये गझल अलघ (सह-संस्थापक, होनासा कन्झ्युमर लिमिटेड) यांचाही समावेश असून आणखी काही रोमांचक नावे लवकरच या श्रेणीत दाखल होणार आहेत. योग आणि सामर्थ्य प्रशिक्षणापासून ते कार्यात्मक तंदुरुस्तीपर्यंत, प्रेक्षकांना प्रामाणिक दिनचर्या, वैयक्तिक शिस्त आणि लोकांच्या नजरेत तंदुरुस्त राहण्याची वास्तविकता जवळून उपलब्ध होते.

## थोडक्यात पण महत्वाचे

### अध्यक्षपदी रामभाऊ झेंडे यांची निवड; नव्या कार्यकारिणीची घोषणा

**शिरूर : हॅलो प्रभात**



शिरूर शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीची नवी कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली असून अध्यक्षपदी रामदास उर्फ रामभाऊ झेंडे यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीमुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. समितीच्या उपाध्यक्षपदी शरद उघडे तर सचिवपदी प्रमोद गायकवाड यांची एकमताने निवड करण्यात आली. निवड प्रक्रियेदरम्यान आंबेडकरी अनुयायी व सामाजिक कार्यकर्त्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. सर्वांनी नव्या पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून आगामी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. नवनियुक्त अध्यक्ष रामभाऊ झेंडे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, यंदाचा जयंती उत्सव शिस्तबद्ध, संघटित आणि सामाजिक बांधिलकी जपत साजरा करण्यात येणार आहे. समाजातील सर्व घटकांना सहभागी करून घेऊन एकोप्याचा संदेश देणारे कार्यक्रम आयोजित केले जातील. विशेषतः युवकांना प्रेरणा देणारे तसेच समाजजागृती करणारे उपक्रम राबविण्यावर भर दिला जाणार आहे. दरम्यान, सचिव प्रमोद गायकवाड यांनी लवकरच जयंती उत्सवाच्या विविध कार्यक्रमांची सविस्तर रूपरेषा जाहीर करण्यात येईल, असे सांगितले. या नव्या कार्यकारिणीच्या निवडीमुळे शिरूरमध्ये जयंती उत्सव अधिक उत्साहात व भव्य स्वरूपात साजरा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### भोंदू बाबांविरोधात कठोर कारवाई करा : ॲड. गणेश म्हस्के

**पुणे : हॅलो प्रभात**

■ पोलीस आयुक्त व ग्रामीण पोलीस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे मागणी

पुणे ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या इतर भोंदू बाबांविरोधात कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी शिवसेना पुणे जिल्हा समन्वयक ॲड. गणेश म्हस्के पाटील यांनी एका निवेदनाद्वारे पुणे पोलीस आयुक्त व ग्रामीण पोलीस अधीक्षक यांच्याकडे केली आहे. अशोक खरात या भोंदू बाबाविरुद्ध अलीकडेच गुन्हा नोंदवून त्याला अटक करण्यात आलेल्या कारवाईच्या पार्श्वभूमीवर हे निवेदन सादर करण्यात आले आहे. निवेदनात नमूद करण्यात आले की, महाराष्ट्र राज्यात जादूटोणा, तंत्र-मंत्र व अंधश्रद्धेच्या नावाखाली नागरिकांची फसवणूक करण्याचे प्रकार वाढत असून विशेषतः महिलांचे आर्थिक व शारीरिक शोषण होत असल्याच्या घटना समोर येत आहेत. अशोक खरात प्रकरणामुळे अशा भोंदू बाबांचे जाळे अजूनही सक्रिय असल्याचे स्पष्ट होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. पुणे ग्रामीण परिसरातही अनेक भोंदू बाबा नागरिकांना भीती दाखवून पैसे उकळणे, महिलांचा गैरफायदा घेणे व अंधश्रद्धा पसरवणे यांसारखे गंभीर प्रकार करत असल्याची माहिती मिळत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.




### मोडनिंब येथे रेल रोको आंदोलन स्थगित; मागण्यांना गती

**मोडनिंब : हॅलो प्रभात**

मोडनिंब रेल्वे स्थानकावर विविध मागण्यांसाठी पुकारण्यात आलेले रेल रोको आंदोलन अखेर स्थगित करण्यात आले असून मागण्यांच्या पूर्ततेसाठी हालचाली सुरू झाल्याने मोडनिंब रेल रोको आंदोलन तात्पुरते मागे घेत आंदोलनकर्त्यांनी तात्पुरता दिलासा घेतला आहे.मोडनिंब येथे रेल्वे गाड्यांना थांबा देणे, शालेय विद्यार्थी व शेतकऱ्यांसाठी भुयारी मार्ग उभारणे, तसेच आरक्षण खिडकी सुरू करणे या प्रमुख मागण्यांसाठी 27 मार्च 2026 रोजी रेल रोको आंदोलनाची नोटीस देण्यात आली होती. मात्र सोलापूर विभागातील विभागीय वाणिज्य व्यवस्थापकांनी मोडनिंब येथे भेट देऊन स्थानिकांशी चर्चा केली व संबंधित प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविल्याची माहिती दिली.यासोबतच माढा मतदारसंघाचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील व आमदार अभिजीत आबा पाटील यांनीही मागण्यांच्या पूर्ततेसाठी पाठपुरावा करत संबंधित कार्यालयांना पत्रव्यवहार केला आहे. खासदार मोहिते पाटील यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या निदर्शनास ही बाब आणून दिल्यामुळे मागण्यांना गती मिळाल्याचे सांगण्यात आले.मोडनिंब हे कुर्डुवाडी -पंढरपूर-मिरज-कोल्हापूर रेल्वे मार्गावरील सुमारे 20 हजार लोकसंख्या असलेले महत्त्वाचे व मध्यवर्ती शहर असूनही येथील स्थानकावर अनेक प्रमुख गाड्यांना थांबा नाही. त्यामुळे परिसरातील वीसहून अधिक गावांतील विद्यार्थी, शेतकरी, रुग्ण, कामगार व व्यापारी यांची मोठी गैरसोय होत आहे. यापूर्वी नागरिकांनी रेल्वे प्रशासनाकडे अनेक वेळा पाठपुरावा केला असून सुमारे 10 हजार पोस्टकार्ड पाठवूनही मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्याने आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता. दरम्यान, 10 एप्रिल 2026 पर्यंत विभागीय रेल्वे व्यवस्थापकांसोबत बैठक घेऊन सकारात्मक निर्णय घेण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. तसेच मंगळवारी पंढरपूर येथून रेल्वे अभियंते मोडनिंब येथे येऊन भुयारी मार्गाबाबत प्रत्यक्ष पाहणी करणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर सध्या सुरू असलेले रेल रोको आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र भविष्यात 10 एप्रिल च्या बैठकीनंतर मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास अधिक तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला आहे अशी माहिती ग्रामदैवत श्री वेताळ परिवारचे अध्यक्ष प्रकाश गिड्डे यांनी दिली.

# विद्येच्या माहेरघरात विद्यार्थिनींची सुरक्षा रामभरोसे?

## रोडरोमिओमुळे विद्यार्थिनींचा जीव टांगणीला : राजाराम दगडेंची कारवाईची मागणी

**पुणे : हॅलो प्रभात**

सोमनाथ साळुंके



विद्येचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शहरातीलशाळा व महाविद्यालय परिसरामध्ये धुमाकूळ घालणाऱ्या रोड रोमियो व टवाळखोरांमुळे शालेय विद्यार्थिनींची सुरक्षा रामभरोसे राहिली असून अशा रोडातोमिओवर कडक कारवाई करण्याची मागणी मल्हार बहुजन सेनेचे अध्यक्ष राजाराम दगडे यांनी लेखी निवेदनाद्वारे पुणे पोलीस आयुक्तांसह वाघोली पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचेकडे केली आहे. वाघोलीतील शाळा, महाविद्यालय परिसरात रोड रोमियोंचा वावर वाढला आहे. घिरट्या घालणाऱ्या रोड रोमियोंमुळे पालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. महाविद्यालय, शाळा परिसरात बुलेटचा कर्कश आवाज काढणाऱ्या रोमियोंचा कायम बंदोबस्त करावा अशी मागणी केली आहे. गेल्या आठवड्यात महाविद्यालय परिसरात कोयत्याने हल्ला झाल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. परंतु वाघोली पोलिसांनी अवघ्या काही तासांतच हल्लेखोरांना ताब्यात घेवून कॉलेज परिसरात अशा कोयता गँग आरोपींची परिसरातून धिंड काढली होती. पोलिसांच्या कारवाईच्या भूमिकेमुळे गुन्हेगारांच्या पायाखालची वाळू सरकून त्यांचे धाबे दणाणले आहेत.प्रथमच वाघोली परिसरात पोलिसांनी गुन्हेगारांवर केलेल्या कारवाईमुळे वाघोली परिसरातील नागरिकांनी मोकळा श्वास घेऊन पोलिसांनी नागरिकांचा विश्वास सार्थ ठरविल्यामुळे नागरिकांमधून पोलिसांचे केलेल्या कारवाईने उत्साहात स्वागतही झाले होते. तर या कारवाईने पोलिसासंदर्भात नागरिकांचा विश्वास बळावला आहे. त्यातच सध्या वाघोली परिसरातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या दृष्टिकोनातून अनेक खाजगी शाळा,महाविद्यालयांचे जाळे पसरले आहे.त्यामुळे वाघोली सह,केसनंद,कालवडी,वाडेबोल्हाई आदी भागातील विद्यार्थिनी अशा शाळा,महाविद्यालयात शिक्षण घेत असतानाच शाळा किंवा महाविद्यालय सुटल्यावर रोडने पायी जाणाऱ्या विद्यार्थिनींच्या छेडछाड करण्याचे प्रकार वाढत आहे.त्यामुळे अनेक विद्यार्थिनींनी महाविद्यालयात जाणे देखील बंद केले असून विद्यार्थिनींच्या पालकांमध्ये घबराटीचे वातावरण पसरले असतानाच राज्यात अल्पवयीन मुलीवर वाढलेल्या अत्याचाराच्या व त्यानंतर त्यांची निघृणपणे होणाऱ्या हत्येच्या घटनेने वर्षभरापूर्वी संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला असतानाच रोदारोमियो कडून होणाऱ्या छेडवाडीच्या घटनेने निष्पाप विद्यार्थिनींना आपला नाहक जीव गमविण्याची वेळ आली आहे.आज मुली वाचविण्यासाठी राज्यातच नाही तर संपूर्ण देशात बेटी पढाव,बेटी बचाव उपक्रम राबविण्यासाठी जाहिराती मार्फत घराघरात जनजागृतीसाठी राज्य प्रशासनाच्या वतीने कोट्यवधी रुपये खर्च करून संपूर्ण देशभर ही योजना राबविण्यात येत असताना दुसरीकडे मात्र शालेय विद्यार्थिनींची काढण्यात येणाऱ्या छेडछाडीच्या प्रकारामुळे संबंधित घटनेची दुसरी शोकांतिका नसल्याची खंत पालकांकडून व्यक्त होत असतानाच विद्यार्थिनीवर छेडछाडीचे गलिच्छ होणारे प्रकार रोखण्यासाठी पोलिसांच्या वतीने महाविद्यालयीन,शाळा परिसरात नियमित पोलीस गस्त वाढवावी व छेडछाडी करणाऱ्या रोडरोमियो यांना पोलिसांचा खाकी हिसका दाखविण्याची हिच योग्य वेळ असून त्यांच्यावर कठोर कारवाई केल्याने यापुढील काळात विद्यार्थिनी सुरक्षित राहतील त्यामुळे अशा रोड्रोमिओवर कारवाईची मागणी दगडे यांनी पुणे शहर पोलीस आयुक्त,याबरोबरच पोलीस उपायुक्त यांचेसह वाघोली पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नंदकुमार गायकवाड यांचेकडे मल्हार बहुजन सेनेच्या वतीने निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

> **वाघोलीतील शाळा, महाविद्यालय परिसरात घडलेल्या घटनांची पोलीस प्रशासनाने गंभीर दखल घेतली असून संबंधित प्रकरणांमध्ये आवश्यक ती कायदेशीर केली आहे. शाळा व महाविद्यालय परिसरात गस्त वाढवण्यात आली आहे. विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेला प्रथम प्राधान्य दिले असून अशा प्रकारांना थारा दिला जाणार नाही.**
>
> **- नंदकुमार गायकवाड (वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वाघोली)**

## स्व. रसिकलाल धारिवाल जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर

**शिरूर : हॅलो प्रभात**



जागतिक कीर्तीचे दानशूर उद्योजक व माजी नगराध्यक्ष स्व. रसिकलाल धारिवाल यांच्या ८७ व्या जयंतीनिमित्त शिरूर येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. पी.आर. धारिवाल फाऊंडेशन व प्रकाशभाऊ धारिवाल मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. रविवार, दि. २९ मार्च २०२६ रोजी शिरूर नगर परिषद मंगल कार्यालय येथे सकाळी ७ ते सायंकाळी ५ या वेळेत शिबिर होणार आहे. गतवर्षी या शिबिरात १५०० हून अधिक रक्तदात्यांनी सहभाग नोंदविला होता. यंदा सहभागी रक्तदात्यांमधून लकी ड्रॉद्वारे ८७ जणांना सायकलींचे वाटप करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. अधिकाधिक नागरिकांनी रक्तदान शिबिरात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव

**लोणी काळभोर : हॅलो प्रभात**




शहरातील इंग्लिश मीडियम शाळा ही केवळ शैक्षणिक गुणवत्तेसाठीच नव्हे तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठीही ओळखली जाते. या शाळेत विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी वर्षभर विविध उपक्रम, स्पर्धा आणि परीक्षांचे आयोजन करण्यात येते. शैक्षणिक वर्षभरात विद्यार्थ्यांनी विविध खेळांमध्ये, शालेय व आंतरशालेय स्पर्धांमध्ये तसेच विविध शैक्षणिक परीक्षांमध्ये शिष्यवृत्ती आणि नवोदय परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. क्रीडा क्षेत्रात धावणे, कबड्डी, खो-खो यांसारख्या खेळांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत अनेक पारितोषिके मिळवली आहेत. तसेच, बुद्धिमत्ता चाचण्या, ऑलिम्पियाड परीक्षा आणि इतर स्पर्धांमध्येही विद्यार्थ्यांनी आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे.

शाळेचा दहावीचा निकाल हा दरवर्षी 100% लागतो, ही शाळेची विशेष ओळख आहे. गुणवंत विद्यार्थ्यांसोबतच प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष देऊन त्यांचा शैक्षणिक स्तर उंचावण्यासाठी शिक्षक सतत प्रयत्नशील असतात.विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आधुनिक शिक्षणपद्धती, अनुभवी शिक्षकवर्ग आणि उत्तम सुविधा यांचा संगम या शाळेत पाहायला मिळतो. यामुळेच पालकांचा विश्वास शाळेवर अधिक दृढ होत आहे. नवीन शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून, आपल्या पाल्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी आजच प्रवेश घ्यावा, असे आवाहन शाळेच्या वतीने करण्यात आले आहे.

## दहिगावात आलिशान 'लँड क्रूझर'चे आगमन

### शरद मोरे यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव




**नातेपुते : हॅलो प्रभात**

माळशिरस तालुक्यातील दहिगाव येथे श्रीराम नवमीच्या पावन मुहूर्तावर शिवप्रसाद उद्योग समूहाचे अध्यक्ष शरद (बापू) मोरे यांच्या नवीन आलिशान टोयोटा लँड क्रूझर चारचाकी गाडीचे विधिवत पूजन करण्यात आले. या प्रसंगी विविध मान्यवर, उद्योग क्षेत्रातील सहकारी व मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थितांनी मोरे यांना शुभेच्छा देत त्यांच्या यशाचे कौतुक केले. नवीन गाडीचे आगमन हे केवळ वैयक्तिक यश नसून दहिगाव गावासाठीही अभिमानाची बाब असल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली. गाडीच्या पूजनावेळी पारंपरिक पद्धतीने पूजा-अर्चा करण्यात आली. त्यामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. या कार्यक्रमाला मोरे परिवारासह उत्तम दादा फडतरे, अतुल जाधव, नानासाहेब डोंगरे, भागवत वाघ, तनुजा खिलारे, मनीषा पवार, निनाद पाटील, भारत सूळ, रणजित सूळ, तुषार निकम, प्रकाश वलेकर, सचिन पवार, सुधीर मोरे, उद्धव सावंत, सागर शिंदे, गणेश वलेकर, योगेश चिकणे, सुशांत पाटील, जयदीप पाटील, तानाजी मोरे, यशवंत नाकुरे, सौदागर सोनवणे, नितीन सावंत, निलेश शिंदे, बाळू खिलारे, निलेश सावंत, सहदेव सावंत, अनिकेत गायकवाड, प्रज्योत किर्दक, मधुकर किर्दक तसेच पत्रकार बांधव उपस्थित होते. दरम्यान, दहिगाव गावात या आलिशान गाडीच्या आगमनामुळे उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांमध्ये विशेष आकर्षण पाहायला मिळत आहे. शिवप्रसाद उद्योग समूहाच्या माध्यमातून सामाजिक व औद्योगिक क्षेत्रात भरीव योगदान देणारे शरद (बापू) मोरे यांच्या या यशामुळे परिसरात सकारात्मक वातावरण निर्माण झाल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

# वाहतूक कोंडीतून मुंढव्याची सुटका कधी?

## चालकांनी मुंढव्याकडे जाण्याची घेतली धास्ती

**पुणे : हॅलो प्रभात**

अहिल्यानगर व सोलापूर महामार्गाला जोडणाऱ्या मुंढवा येथील चौकात बाराही महिने वाहनचालकांना वाहतूक कोंडीच्या चक्रव्युहात अडकण्याची वेळ येत असल्याने नेहमीच होणाऱ्या या कोंडीतून सुटका होणार कधी?असा संतप्त सवाल वाहनचालकांकडून करण्यात येत आहे. पूर्व हवेली तालुक्यातील व शहरातील मध्यस्थ असलेले ठिकाण म्हणून प्रामुख्याने मुंढवा भागाकडे पाहिले जात आहे.त्यातच परिसरातून पुणे शहर,कोरेगाव पार्क,मांजरी,हडपसरासह सोलापूर व अहिल्यानगर या प्रमुख महामार्गाला मार्ग जोडला गेल्याने बाराही महिने येथील मुख्य चौकात नेहमीच वाहनांची वर्दळ दिसून येत असली तरी पण या भागातील वाहनांच्या रांगा जवळपास दिड ते दोन किमी अंतर लांबवर लागलेल्या दिसून येत आहे.मात्र या कोंडीत प्रामुख्याने दुचाकीस्वारांचे मोठ्या प्रमाणात अडचण होत आहे.कारण उन्हाळ्यात भर दुपारचे पडणारे कडक ऊन तर पावसाळ्यात पडणारा पाऊस या मुख्य अडचणीत वाहनचालक अडकला असताना यापूर्वी पुलावरील होणारी वाहतूक कोंडीची समस्या घेऊन जुन्या पुलानजिकच काही वर्षांपूर्वी नव्याने दुसरा पूल बांधून तो वाहतुकीसाठी करण्यात आला असला तरी या भागातील वाहतुकीची असलेली परिस्थिती जैसे थे असल्यामुळे या मार्गावरून वाहन चालवताना कसरत करूनच ते चालविण्याची वेळ येऊन अनेकदा या मार्गावर नेहमीच छोट्या मोठ्या अपघाताच्या घटना घडण्याचे प्रमाण दिवसेदिवस वाढत आहे.




विशेष करून येथील चौकात नेहमीच वाहतूक कोंडीतून वाहनचालकांची सुटका होण्याच्या उद्देशाने मुंढवा वाहतूक नियंत्रण कक्षाच्या वतीने वाहतूक पोलिस अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक करून हा चौक मुख्य वाहतूक कोंडीच्या गराड्यातून सुटला नसून त्यांना देखील होणारी कोंडी सोडविण्यासाठी कसरत करण्याशिवाय पर्याय राहत नाही.तर अनेकदा या मार्गावरून जाताना वाहनचालकांना कसरत करूनच वाहन चालविण्याची वेळ येऊन अर्धा ते एक किमीचे अंतर कापण्यासाठी त्यांना चक्क भर उन्हात ताटकळत वाहन घेऊन थांबण्याची वेळ येऊन अनेकांना तर येथील चौकातून वाहन चालवताना अंगावर काटा येत आहे. त्यामुळे अनेक वाहनचालकांनी हडपसरकडे जाण्यासाठी विळखा घालून आव्हाळवाडी या मार्गावरून जाण्यास पसंती दिली आहे. खराडी भागातून केशवनगर,मुंढवा,मांजरी या भागांना जोडण्यासाठी व येथे नेहमीच होणारी कोंडीतून वाहनचालकांची सुटका व्हावी.या हेतूने खराडी भागातील मुळा _मुठा नदीवर नव्याने बांधण्यात येत असलेल्या उड्डाणपुलाचे काम सुरू आहे. मात्र ते अनेक वर्षापासून अतिशय संथ गतीने सुरू आहे. त्यामुळे संबंधित पुलाचे काम लवकरात लवकर पूर्ण झाल्यास असलेल्या वाहतूक कोंडीचा मुख्य प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे त्यामुळे प्रशासनाने देखील लवकरात लवकर पुलाचे काम पूर्ण होण्याची मागणी खराडी व मुंढवा भागातील नागरिकांकडून होत आहे.जेणे करून वाहतूक कोंडीच्या चक्रव्युहात अडकलेल्या वाहनचालकांची मुख्य अडचणीतून सुटका होईल.यामुळे हे काम लवकर पूर्ण करण्याच्या मागणीला जोर धरू लागली आहे.

हॅलो प्रभात
# अहिल्यानगर
जिल्हा विशेष
शनिवार, दि. २८ मार्च २०२६








## कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांपासून युवकांनी प्रेरणा घ्यावी

**आ. अशोकराव माने**

**हुपरी : हॅलो प्रभात**

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्य व विचारांपासून युवकांनी प्रेरणा घेऊन स्वतःचे व्यक्तिमत्व घडवावे, असे प्रतिपादन आमदार अशोकराव माने यांनी केले. ते रयत शिक्षण संस्थेच्या चंद्राबाई शांताप्पा शेंडुरे कॉलेज, हुपरी येथे आयोजित वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

यावेळी त्यांनी कर्मवीरांच्या स्वावलंबी शिक्षण व 'कमवा व शिका' या योजनांचा विद्यार्थ्यांनी अभ्यास करून त्यातून प्रेरणा घ्यावी, असे आवाहन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए.सी. शिंदे होते. तसेच रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य राहुल इंग्रोळे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी वर्षभरात क्रीडा, सांस्कृतिक, राष्ट्रीय सेवा योजना तसेच विविध विभागांमध्ये प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा गौरवचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या काही प्राध्यापकांचाही यावेळी सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमास मानसिंग देसाई, सुरेश इंग्रोळे, राजश्री काटकर, उपप्राचार्य बाळासाहेब जाधव, पत्रकार तसेच विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. आय. एच. मुल्ला यांनी केले, तर सूत्रसंचालन प्रा. डॉ. संध्या माने यांनी केले. आभार प्रा. डी. सी. तुळशीकट्टी यांनी मानले.

# आत्मा मालिक संकुलाची दमदार झेप

## गांधर्व संगीत परीक्षेत १००% निकाल : विद्यार्थ्यांचे राष्ट्रीय स्तरावरही यश

**कोपरगाव : हॅलो प्रभात**

कोकमठाण येथील आत्मा मालिक शैक्षणिक व क्रीडा संकुलात 'अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळा'च्या संगीत परीक्षांचे आयोजन उत्साहात करण्यात आले होते. या परीक्षेचा नुकताच निकाल जाहीर झाला असून संकुलाने शंभर टक्के निकालाची उल्लेखनीय कामगिरी नोंदवली आहे. प.पु. सद्गुरू आत्मा मालिक माऊलीच्या आशीर्वादाने व संस्थेचे अध्यक्ष मा. नंदकुमारजी सूर्यवंशी साहेब यांच्या प्रेरणेने, संकुलात विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतिक व संगीत आणि वारकरी विभाग कार्यरत आहे. या विभागामार्फत विद्यार्थ्यांची



सांगीतिक वाटचाल शास्त्रशुद्ध पद्धतीने घडावी, यासाठी गांधर्व महाविद्यालय मंडळाच्या संगीत परीक्षांचे नियोजन करण्यात आले होते. यावर्षी गायन व तबला वादन या विविध सांगीतिक स्तरांवर एकूण ५४४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. विशेष म्हणजे सर्वच्या सर्व ५४४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून संकुलाचा निकाल अत्यंत लक्षवेधी ठरला आहे. प्राथमिक ते माध्यमिक स्तरांपर्यंतच्या सर्वच श्रेणींमध्ये विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत बहुतांश विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य व प्रथम श्रेणी प्राप्त केली आहे. दरम्यान, संकुलाच्या इतिहासात प्रथमच घडलेल्या एका उल्लेखनीय कामगिरीने सर्वांचे लक्ष वेधले आहे. 'मध्यमा प्रथम' या चौथ्या स्तरावरील परीक्षेत आत्मा मालिक इंग्लिश मीडियम गुरुकुलच्या तीन विद्यार्थिनींनी राष्ट्रीय स्तरावर यश संपादन केले आहे. यामध्ये कु. दिपाली तुळशीदास राऊत या विद्यार्थिनीने संपूर्ण देशात प्रथम श्रेणीमध्ये स्थान मिळवले, तर चैतन्या एकनाथ तुंगार व जागृती हरिदास भांगरे या विद्यार्थिनींनी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण होत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. विद्यार्थ्यांच्या या दैदीप्यमान यशामुळे आत्मा मालिक संकुलाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, याकामी शैक्षणिक व्यवस्थापक सुधाकर मलिक, साईनाथ वर्पे, सांस्कृतिक विभाग व्यवस्थापक आत्मदर्शन बागडे, वसंत नारद, बाळासाहेब परजणे, शुभम कोळी, संजय सूर्यवंशी, कमलेश जाधव, स्वप्नील राऊत, निलेश काळे यांनी मेहनत घेतली आहे. आत्मा मालिक संस्थेचे अध्यक्ष नंदकुमारजी सूर्यवंशी म्हणाले कि, आत्मा मालिक संकुलातील सर्व विद्यार्थ्यांनी संगीत परीक्षेत मिळवलेले हे यश अत्यंत अभिमानास्पद आहे. शंभर टक्के निकाल ही केवळ संख्या नसून विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे, शिक्षकांच्या मार्गदर्शनाचे आणि संस्कारांच्या बळाचे प्रतीक आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा. यावेळी संस्थेचे अध्यक्ष नंदकुमार सूर्यवंशी उपाध्यक्ष बाळासाहेब गोर्डे, सरचिटणीस हनुमंतराव भोंगळे, कोषाध्यक्ष विठ्ठलराव होन, विश्वस्त प्रकाश गिरमे व प्रदीप कुमार भंडारी यांनी अभिनंदन करत पुढील शैक्षणिक व सृजनशील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## थोडक्यात पण महत्वाचे




### कृषि विज्ञान प्राध्यापक पतसंस्थेच्या चेअरमनपदी दत्तात्रय कदम

**राहुरी : हॅलो प्रभात**

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील कृषि विज्ञान प्राध्यापक सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी दत्तात्रय कदम, तर व्हाइस चेअरमनपदी भारती बरे यांची निवड करण्यात आली. पतसंस्थेच्या पदाधिकारी निवडीची प्रक्रिया खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. यावेळी संस्थेचे संचालक डॉ. विक्रम कड, डॉ. नारायण मुसमाडे, योगेश भिंगारदे, आप्पासाहेब चोपडे, संचालिका माधुरी औताडे तसेच कर्मचारी व सभासद उपस्थित होते. जिल्ह्यातच नव्हे तर राज्यात नावाजलेल्या या पतसंस्थेमुळे सभासदांच्या आर्थिक उन्नतीस मोठा हातभार लागला आहे. संस्थेच्या प्रगतीत आजी-माजी संचालक व सभासदांचे मोलाचे योगदान असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. निवडीनंतर कुलगुरू डॉ. विलास खर्चे, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे तसेच संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके यांनी नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

### आठवडे बाजारात प्राजक्त तनपुरे यांची पाहणी

**राहुरी : हॅलो प्रभात**



राहुरी येथील आठवडे बाजारात गुरुवारी दुपारी माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी भेट देत परिस्थितीचा आढावा घेतला. नगरपालिकेच्या निवडणुकीदरम्यान शहर विकास आघाडीने बाजारात येणाऱ्या शेतकऱ्यांना नगरपरिषदेची कर पावती भरावी लागणार नाही, असे दिलेल्या आश्वासनाची अंमलबजावणी होत आहे का, याची त्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी तनपुरे यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी व अनुभव जाणून घेतले. शेतकऱ्यांनीही कर सवलतीबाबतची स्थिती त्यांना सांगितली. या भेटीदरम्यान नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे, उपनगराध्यक्ष गजानन सातभाई, स्वीय सहाय्यक प्रकाश शेलार, विजय टापरे, सुनील राऊत तसेच नगरपरिषदेचे कर्मचारी व स्थानिक शेतकरी उपस्थित होते.

### चौथी, सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेचे प्रवेशपत्र उपलब्ध...

**पुणे : हॅलो प्रभात**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे घेण्यात येणाऱ्या इयत्ता चौथी आणि सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेचे प्रवेशपत्र ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात आले आहे. ही परीक्षा २६ एप्रिल रोजी राज्यभरातील ७ हजार ७९३ परीक्षा केंद्रांवर होणार असून, चौथी आणि सातवीच्या मिळून एकूण ११ लाख ५५ हजार ७६७ विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंदणी केली आहे. परीक्षा परिषदेच्या उपायुक्त निशादेवी बंडगर यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे परीक्षेच्या प्रवेशपत्र उपलब्धतेबाबतची माहिती दिली. चौथी आणि सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेचे प्रवेशपत्र परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावरील शाळा लॉगीनमध्ये उपलब्ध करून देण्यात आले आहे. मुख्याध्यापकांनी प्रवेशपत्राची मुद्रितप्रत घेऊन ती विद्यार्थ्यांना वितरित करावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. परीक्षा परिषदेने दिलेल्या आकडेवारीनुसार यंदा चौथीच्या परीक्षेसाठी ६ लाख ९४ हजार ४७, सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेसाठी ४ लाख ६१ हजार ७२० अशा एकूण ११ लाख ५५ हजार ७६७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.

## दुर्दम्य इच्छाशक्तीच्या पाठीशी, डॉ.पतंगराव कदम शिष्यवृत्ती

### डॉ.आर.बी.कुलकर्णी : डॉ.पतंगराव कदम महाविद्यालयात 'शिष्यवृत्ती प्रदान समारंभ' उत्साहात

**सांगली : हॅलो प्रभात**

भारती विद्यापीठाचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली येथे 'डॉ. पतंगराव कदम गुणवत्ता शिष्यवृत्ती' प्रदान समारंभ उत्साहात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात भारती विद्यापीठ गीत व प्रार्थनेने झाली. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मेडिकल सायन्सेस गोल्ड मेडल विजेते (१९८७) डॉ. आर. बी. कुलकर्णी (विद्यमान अकॅडमिक डायरेक्टर, भारती विद्यापीठ मेडिकल कॉलेज, सांगली; माजी अधिष्ठाता, फॅकल्टी ऑफ मेडिकल सायन्सेस) हे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. व्ही. ए. रणखांबे होते. उपप्राचार्य डॉ. अमित सुपले, कनिष्ठ विभागप्रमुख प्रा. ए. एल. जाधव, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. अमर तुपे, शिष्यवृत्ती समन्वयक डॉ. एन. डी. पवार, परीक्षा विभागप्रमुख प्रा. ए. ए. कुंभार तसेच व्यवसाय शिक्षण विभागप्रमुख डॉ. आनंदा सपकाळ आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते भारती



विद्यापीठाचे संस्थापक कुलपती डॉ. पतंगराव कदम साहेब यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

कार्यवाह डॉ.विश्वजीत कदम यांनी साहेबांच्या स्मृती प्रित्यर्थ गुणवंत विद्यार्थ्यांच्यासाठी ही योजना सुरू केली आहे. भारती विद्यापीठाच्या कॉलेजेस मध्ये, वर्गात गुणानुक्रमे येणारे पहिले दोन विद्यार्थी, तसेच विशेष गुणवत्ता धारक विद्यार्थी आणि कला, क्रीडा, सांस्कृतिक आणि युपीएससी/एमपीएससी क्षेत्रात , तसेच राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील उल्लेखनीय यश प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना ही विशेष शिष्यवृत्ती प्रदान केली जाते. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. आर. बी. कुलकर्णी यांनी आपल्या भाषणात, डॉ. पतंगराव कदम शिष्यवृत्ती ही केवळ आर्थिक मदत नसून विद्यार्थ्यांमध्ये ध्येयप्रवणता हा संस्कार रुजवणारी योजना आहे, असे प्रतिपादन केले. ही योजना राबवणारे भारती विद्यापीठातील पहिले महाविद्यालय म्हणून डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय सांगली हे प्रथम स्थानावर आहे, या बद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी ध्येयप्रवण वृत्तीने, आव्हाने झेलीत, मूल्याधिष्ठित जगावे, अपमान झेलावेत आणि परिस्थिती बद्दल तक्रार न करता, स्वतःहून संधींचे अवकाश निर्माण करावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ.रणखांबे आपल्या मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, कार्यवाह यांच्या मार्गदर्शनाखाली भारती विद्यापीठाने गुणवंत विद्यार्थ्यांसाठी घेतलेला हा शिष्यवृत्तीचा निर्णय हा एक महत्वाचा आणि ऐतिहासिक निर्णय आहे. भारती विद्यापीठाचे संस्थापक डॉ. पतंगराव कदम यांच्या नावाने सुरू असलेली ही शिष्यवृत्ती योजना संपूर्ण महाराष्ट्रातच नव्हे तर देशात आदर्शवत ठरेल असे प्रतिपादन पालकप्रतिनिधीनी या वेळी केले. समारंभात एकूण ५४ गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करून त्यांना धनादेश स्वरुपात आणि प्रमाणपत्र देऊन शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. या कार्यक्रमाचे स्वागत उपप्राचार्य डॉ.अमित सुपले यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.भारती भावीकट्टी यांनी केले. तर आभार प्रदर्शन समन्वयक डॉ. एन.डी. पवार यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व शिष्यवृत्ती मिळालेली विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तूर्तास पाणीपुरवठा अखंडित

**पिंपरी : हॅलो प्रभात**

पिंपरी-चिंचवड शहरासाठी पवना धरणातून उचलण्यात येणाऱ्या पाण्याची पाणीपट्टी आणि पाणी शुद्ध करत नसल्याचा ठपका ठेवून आकारलेल्या दंडाच्या रकमेची थकबाकी न भरल्यास पाणीपुरवठा खंडित करण्याचा इशारा जलसंपदा विभागाने दिल्यानंतर महापालिकेने २० कोटी रुपयांची थकबाकी शुक्रवारी (२७ मार्च) भरली. त्यामुळे तूर्तास पाणीपुरवठा खंडित होण्याचे संकट टळले आहे. मावळातील पवना धरणातून महापालिका ५५० दशलक्ष लिटर (एमएलडी) अशुद्ध पाणी दिवसाला उचलते. या पाण्याची पाणीपट्टी जलसंपदा विभागाकडून आकारली जाते. तसेच, महापालिका पाणी शुद्ध करत नसल्याने दंडही आकारला जात आहे. पाणीपट्टी आणि २७५ एमएलडी पाण्यावर प्रक्रिया न करता पाणी नदीत सोडले जाते, याबाबतचा दंड, अशी १४३ कोटींची थकबाकी झाली होती. ही थकबाकी भरण्याबाबत १७ मार्चला जलसंपदा विभागाने नोटीस दिल्यानंतर महापालिकेने १९ मार्च



रोजी सात कोटी रुपयांचा भरणा केला. उर्वरित १३६ कोटी रुपयांची थकबाकी तातडीने भरावी, अन्यथा दोन दिवसांत पाणीपुरवठा खंडित करण्याचा इशारा जलसंपदा विभागाने दिला होता. त्यानंतर शहरातील लोकप्रतिनिधींची जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याबरोबर बैठक झाली. या बैठकीत १३५ कोटी रुपयांची थकबाकी महापालिकेने भरण्याचा निर्णय झाल्याचे जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. त्यानुसार महापालिकेने शुक्रवारी २० कोटी रुपयांची थकबाकी भरली आहे. त्यामुळे तूर्त पाणीपुरवठा खंडित होण्याचे संकट टळले आहे. पाणीपट्टीची रक्कम थकविली जात नाही. सात कोटी रुपयांची पाणीपट्टी पूर्वीच भरली आहे. पाणी शुद्ध करत नसल्यामुळे आकारलेल्या दंडाची २० कोटी रुपयांची थकबाकी जलसंपदा विभागाकडे भरली आहे.

## रुपाली चाकणकरांचा राष्ट्रवादीच्या प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा

**पुणे : हॅलो प्रभात**



रुपाली चाकणकर यांनी राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा दिल्याची माहिती समोर आली आहे. "खरात प्रकरणाबाबत पहिल्या दिवशीच मी माझी भूमिका स्पष्ट केली आहे. त्याच्या आर्थिक व्यवहारात, त्याच्या गैरकृत्यात दुरान्वये संबंध नाही, आजही तीच स्पष्ट व ठाम भूमिका आहे. तपासादरम्यान या सर्व बाबी निष्पन्न होतीलच. खोटे, असत्य व कुठलाही पुरावा नसताना जे आरोप माध्यमांमधून होत आहेत, ते वेदनादायक आहे. सत्य प्रखरतेने सिद्ध होईलच. हा तपास पारदर्शकपणे व निष्पक्षपणे व्हावा, ही माझी मागणी मी यापूर्वीच मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि पोलीस महासंचालक यांच्याकडे केली आहे. आज सकाळी फोनद्वारे आदरणीय सुनेत्रावहिनी पवार यांच्याशी झालेल्या चर्चेनुसार मी माझ्या राष्ट्रवादी महिला काँग्रेस प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा देत आहे", असं रुपाली चाकणकर यांनी त्यांच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

## शर्त भंग प्रकरणात शासनाच्या निर्णयाचे आभार - पराग संधान

**कोपरगांव : हॅलो प्रभात**

महसूल विभागाच्या कामकाजात गती आणि पारदर्शकता आणण्यासाठी राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. जमिनीच्या अटींचे (शर्तभंग) किरकोळ उल्लंघन नियमित करण्याचे अधिकार आता जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तांना देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे सुमारे ९० टक्के प्रकरणे स्थानिक पातळीवरच निकाली निघण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. परिणामी नागरिकांना शासनाच्या कार्यालयीन प्रक्रियेत होणारा विलंब कमी होणार असून, त्यांना जलद न्याय मिळणार आहे.

**नगराध्यक्ष पराग संधान यांनी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त करताना सांगितले की, हा निर्णय सर्वसामान्य नागरिकांच्या हिताचा असून प्रशासन अधिक कार्यक्षम करण्याच्या दिशेने मोठे पाऊल आहे. यामुळे अनेक कुटुंबांना न्याय मिळेल आणि त्यांची वर्षानुवर्षे प्रलंबित असलेली कामे मार्गी लागतील.एकूणच, शासनाच्या या निर्णयामुळे नागरिकांचा विश्वास वाढणार असून, महसूल प्रशासन अधिक सक्षम आणि नागरिकाभिमुख होण्यास मदत होणार आहे.**

यासोबतच, १५ नोव्हेंबर १९६५ ते सप्टेंबर २०२४ या कालावधीत तुकडेबंदी कायद्याचे उल्लंघन झालेल्या प्रकरणांना विनाशुल्क नियमित करण्याचा निर्णय देखील घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे अनेक शेतकरी व नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. दीर्घकाळ प्रलंबित असलेली प्रकरणे आता सुलभ पद्धतीने निकाली निघतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. कोपरगाव मतदारसंघात देखील अशा अनेक प्रकरणांचा लाभ नागरिकांना होणार असून, या निर्णयाचे सर्वत्र स्वागत होत आहे. या पार्श्वभूमीवर कोपरगाव नगरपरिषदेचे नगराध्यक्ष पराग संधान यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.मा. आ. स्नेहलताताई कोल्हे, युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांनी सातत्याने शासनाकडे पाठपुरावा केला होता तसेच कोपरगाव नगरपरिषद निवडणूक काळात नागरिकांनी निवेदन दिले होते त्या नागरिकांना या निर्णयाने फायदा होणार आहे. नगरपालिका, महानगरपालिका तसेच नगरपरिषदेच्या जवळ येणारा ग्रामीण भाग यातील तुकडा बंदी कायदा उठवला.1965 ते सप्टेंबर 2024 पर्यंत जे तुकडे पडलेले असतील ते नियमाकुल करता येईल. यामुळे नागरिकांना एक दोन गुंठेही जागा खरेदी करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

## 'एक तास गोदावरी' स्वच्छतेसाठी कोपरगावकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**कोपरगांव : हॅलो प्रभात**

अनेक तज्ञांच्या मते भविष्यातील तिसरे महायुद्ध हे फक्त नैसर्गिक साधन संपत्ती वरूनच होणार असून यात पाणी हा महत्त्वाचा घटक असणार आहे त्यामुळे प्रत्येक देशाने पाण्याचे जतन तसेच पाणी वाहून नेणाऱ्या स्त्रोतांची स्वच्छता करणे ही काळाची गरज होऊन बसली आहे आणि यासाठी कोपरगाव शहरातील गोदामाई प्रतिष्ठान ट्रस्ट चे संस्थापक अध्यक्ष आदिनाथ ढाकणे व त्यांची संपूर्ण टीम कोपरगाव शहरातून वाहणाऱ्या पवित्र अशा गोदावरी



नदीची ३६० आठवड्यापासून निरंतरपणे स्वच्छता करत आहे. या स्वच्छता मोहिमेचा ३६१ वा आठवडा असल्याने या मोहिमेत कोपरगाव शहरातील अनेक मान्यवरांनी सहभागी होत एक तास गोदावरी नदी स्वच्छतेसाठी आपल्या उज्वल भविष्यासाठी ही मोहीम राबवत एक अनोखा संदेश दिला आहे.

**याप्रसंगी व्यापारी महासंघाचे सुधीर डागा यांनी नदीपात्रात कोणी कचरा टाकू नये याकरीता सुरक्षेचा उपाय म्हणून आवश्यक ते सीसीटीव्ही कॅमेरे नदी पुलावर बसवण्यासाठी वैयक्तिकरित्या नगरपालिका प्रशासनाला देणार असल्याचे सांगितले.**

याप्रसंगी प्रसिद्ध सिने अभिनेते चिन्मय उदगीरकर, कोपरगाव नगरपालिकेचे मुख्याधिकारी सुहास जगताप, कोपरगाव शहर पोलीस उपनिरीक्षक संदीप सोने, दीपक रोठे, सोमय्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विजय ठाणगे, कोपरगाव नगरपालिकेचे नगरसेवक बाळासाहेब रुईकर, रवींद्र कथले, व्यापारी महासंघाचे सुधीर डागा, भाऊसाहेब भाबड, विजय सांगळे, गोरे सर, कोपरगाव तालुका विद्यार्थी सहाय्यक समितीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. हिरालाल महानुभव, सामाजिक कार्यकर्ते सचिन परदेशी, प्रसाद पर्हे, विशाल राऊत, शहरातील पर्यावरण प्रेमी नागरिक तसेच सोमैय्या महाविद्यालयाचे विद्यार्थी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, नामदेव परजणे पाटील लॉ कॉलेजचे शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी तसेच गोदामाई ट्रस्टचे सर्व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी सिने अभिनेते चिन्मय उदगीरकर,व्यापारी महासंघाचे सुधीर डागा, मुख्याधिकारी सुहास जगताप, पोलीस उपनिरीक्षक संदीप सोने आदींनी आपले मनोगत व्यक्त करत ३६० आठवड्यापासून गोदावरी नदीची स्वच्छता करत असलेल्या गोदामाई ट्रस्टचे आदिनाथ ढाकणे व त्यांच्या संपूर्ण टीमचे अभिनंदन करत त्यांना शुभेच्छा दिल्या.